# शिवार

१९-९
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५५५७.

REFBK-0006197
REFBK-0006197

— कृ. नारखेडे

৭৫৪৭

৩।৭৫

# शिवार

## जानपद्गीतांचा संग्रह

क्र.१०५ १९६

लेखक

के. नारखेडे,

डी. एस्. हायस्कूल, भुसावळ.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

वा. क्र.

REFBK-0006197

REFBK-0006197

किंमत १ रुपया

प्रकाशक

**ग. ल. ठोकळ, बी. ए., बी. टी.**

५६४/१ शिवाजीनगर, पुणें ५.

* * *

* * *

मुद्रक

**प्रल्हाद भास्कर काळे,**

प्रतिभा प्रेस, ३१५ शनवार पेठ, पुणें

# बांधावरून

महाराष्ट्रशारदेच्या मंदिरांत जानपदगीतांचें स्वतंत्र दालन उघडून उणींपुरीं बारा वर्षें लोटून गेलीं. कविवर्य यशवंत यांनीं या दालनावरला पडदा दूर केला. कविवर्य गिरीश यांनीं त्यांना हातभार लाविला. हाडा-पेरानें शेतकरी असल्यामुळें माझें लक्ष या दालनाकडे वेधलें गेलें व मी सात वर्षांपूर्वी महाराष्ट्रांतील कवींच्या जानपदगीतांचा प्रातिनिधिक संग्रह ‘सुगी’ या नांवानें प्रसिद्ध केला. माझे मित्र ग. ह. पाटील, सोपानदेव चौधरी, ना. घ. देशपांडे, प्रो. कोलते, प्रो. पंडित, सुरेश इत्यादि कवींनीं या दालनांत पटकाविलेलीं मानाचीं स्थानें कोणालाहि दृष्टिआड करतां येणार नाहींत.

इ. स. १९३७ सालीं मीं माझ्या कवितांचा संग्रह ‘मीठभाकरी’ या नांवानें प्रसिद्ध केला.

‘सुगी’ प्रसिद्ध केल्यानंतर खानदेशांतले प्रसिद्धीविन्मुख कवि श्री. नारखेडे यांचा व माझा परिचय झाला. त्यांच्या कविता वाचल्यानंतर ‘सुगी’ साठीं आपल्याला त्या मिळूं शकल्या नाहींत, या गोष्टीची मला चुटपुट लागली.

श्री. नारखेडे यांचा व माझा स्नेह उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेला व आज त्यांचें पुस्तक प्रकाशांत आणण्याचें अमोल श्रेय मी घेत आहें.

जानपदगीतांचे दोन प्रकार आहेत. खुद्द शेतकऱ्यांच्या तोंडची भाषा वापरून लिहिलेल्या नाट्यगीतांचा एक आणि खेडवळ वातावरण निर्माण केलेल्या वर्णनपर कवितांचा दुसरा. नारखेडे यांच्या कविता दुसऱ्या प्रकारांत मोडतात. खानदेशांतल्या शेतकऱ्यांच्या जीवनाचें रमणीय प्रतिबिंब

तुम्हांला शिवारांत पहावयास मिळेल. माझा व त्यांचा एकाच बाबतींत मतभेद आहे; आणि तो म्हणजे भाषेबाबत. जानपदगीतांची भाषा ग्रामीण असावी असें माझें मत आहे. श्री. नारखेडे यांच्या कवितांची भाषा बरीच प्रौढ आहे. याविषयीं त्यांचा खुलासा पुढीलप्रमाणें आहे.

"पांढरपेशा वर्गांतील लोकांना घटकाभर मौज वाटते म्हणून ग्रामीण भाषेंत काव्यरचना केली जाते. ज्या जनसमूहासमोर अशीं गीतें म्हटलीं जातात तो जनसमूह डोळ्यांसमोर आणला कीं माझें मत तुम्हांला पटेल. जानपदगीतें हीं शेतकऱ्यांकरितां लिहिलेलीं नसतात. तीं वाचावयाची त्यांना जरूरहीं नसते. जानपदभाषेंतील एकादा दुसरा शब्द अगर वाक्प्रचार रचना करतांना उपयोगांत आणून तो नागर भाषेच्या पचनीं पडेल इतकाच फक्त त्यांचा उपयोग होणें बरें असें मला वाटतें."

हा मतभेदाचा प्रश्न असला तरी हीं गीतें लिहिण्यांत श्री. नारखेडे यांनीं अभिनंदनीय यश मिळविलें आहे हें निर्विवाद आहे.

रसिकांना शिवारांत सोडून मी त्यांची रजा घेतों.

ता. २४-५-१९४१
पुणें.

ग. ल. ठोकळ.

# अनुक्रमणिका


१ काळजाचा तुकडा ... ... ... १
२ काय अुणें मज ... ... ... ३
३ नाचूं लागे तेंहि तसें ... ... ... ५
४ कांटा ... ... ... ... ८
५ मीलन ... ... ... ... ११
६ न्याहारी ... ... ... ... १३
७ कळणार कधीं ! ... ... ... १५
८ चिमुकलें जग ... ... ... १६
९ जीवित-पूर्ति ... ... ... १७
१० पेरणी ... ... ... ... १८
११ बांधावर ... ... ... ... २०
१२ अम्हांला काम सुचेना गडे ! ... ... २२
१३ युगत ... ... ... ... २४
१४ कारभारीण ... ... ... २७
१५ केळीच्या बागेंत ... ... ... २९
१६ ओळख ... ... ... ... ३१
१७ त्या शेतकऱ्याची दिवाळी ... ... ... ३४
१८ पयोदान ... ... ... ... ३५
१९ मजूर ... ... ... ... ३७
२० हासुनि युवक वळे ... ... ... ३९
२१ लक्ष्मी ... ... ... ... ४१

२२ माझी देवी ... ... ... ४२
२३ घरधनीण ... ... ... ... ४४
२४ आधार ... ... ... ... ४६
२५ संजीवन ... ... ... ... ४९
२६ शेतकऱ्याचें दैवत ... ... ... ५१
२७ तिचें नशीब ... ... ... ५३
२८ दसऱ्याचें सोनें ... ... ... ५५
२९ अंबारींतून... ... ... ... ५७
३० गुराखी ... ... ... ... ५८
३१ अमरवेल ... ... ... ... ६१
३२ शिवबा ... ... ... ... ६३
३३ राणूचें शेत १ ... ... ... ६८
३४ राणूचें शेत २ ... ... ... ७२
३५ घरोघरीं ... ... ... ... ७७
३६ विनवणी ... ... ... ... ७९



9230
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

# काळजाचा तुकडा

( जाति—शूर्पणखा )

पाहुनी भान हरपतें—शेत हें,
पाहुनि मन हरखतें.

घामाने शिंपुनि मळा
पेरतों कधी जोंधळा,
मोत्यांची खुलते कळा
तें अन्न-ब्रह्म वितरितें.

जंव फुटे कपाशी, किती—
चांदण्या गोड हासती !
मृदु वाऱ्यावर नाचती,
आकाश अिथे अुतरतें.

भुअिमुगा बहर येतसे,
गालिचा पसरला दिसे,
वरि सोन-फुलांचे ठसे
खुलुनिया गोड हासतें.

अन् पीक काढल्यावर
मी फिरवुनिया नांगर
करिं तयार जों वावर
ताटीच साफ वाटते·

जणु अंथरलें कांबळ,
वाढलें दिसे मोहळ,
पसरलें जसें काजळ,
काळोख थिजे जणु अिथे·

पाअूस सरसरा पडे,
प्रभु वरुण घालतो सडे,
मखमाल अुठे चहुकडे,
ती शिवारास खुलविते·

हें शिवार माझें असें
करुं मोल तयाचें कसें ?
जग अुणें त्यापुढे दिसे !
मम काळिज-तुकडाच तें—

—

## २

# काय उणें मज

( जाति—श्यामाराणी )

पहा कसे हे वेल पसरले !
फळाफुलांनी शेत बहरलें !
भुमातेच्या हृदयामधले
प्रेमकण गडे,
पहा चहुकडे
कसे विखरले शेतांत !

मेघराज गे, हसुनि अंबरीं
सुधा स्वर्गिची वर्षि भूवरी,
काय सुखाला अुणें तोंवरी
स्वर्ग कशाला—
हवा अम्हांला ?
वैकुंठच हें साक्षात.

बांधावर हें सान झोपडें,
अूब सुखाची त्यांत सांपडे,
पर्वा नच गे, काय पलिकडे !
राज्य आपुलें—
जरी चिमुकलें
अुणीव कसली नच त्यांत.

सखे, जिवाचे पहा संवगडी,
राजा-परधान्या नच जोडी,
घरच्या गाअीची ही जोडी,
राज्यधुरा ही
ओढित राही
पाअुस-थंडी-वाऱ्यांत.

गाय, म्हैस अन् चार वांसरें,
मूक, मूढ नच हीं जनावरें,
नयनांतुन बघ हृदय पाझरे,
कुटुंबांतली
हीच मंडळी,
प्रेम जाणते हृदयांत.

गृहधन सारें शेत अेकलें,
गुरें चार, प्रिय आप्त लाभले,
अेवढेंच जग सखे, आपुलें !
पोटापुरतें
श्रमतां मिळतें
भूमातेच्या हृदयांत.

या सर्वांची सदय-स्वामिनी
ही हृदयाची प्रेमळ राणी
संनिध माझ्या अुभी राहुनी
अुधळि मजवरी
सुधा, तोंवरी
काय अुणें मज जगतांत ?

---

२

# नाचूं लागे तेंहि तसें

( जाति–श्यामाराणी )

नव–जीवन अंगात संचरे,
जागीं झालीं फुलें, पांखरें,
अुत्साहें जग नटलें सारें,
        कोंडुनि घेअिल
        कोण घरांतिल
                टिचभर जागेमधि रसिक ?

विहंग गाती सुस्वर गाणीं,
कलकल मधुरव येअी कानीं,
सूर घुमे तो साऱ्या रानीं,
        सुस्वर स्वनि
        का वेडावुनि
                रानहृदय हें नाचतसे ?

घेत कोकिला अुंच लकेरी,
दिगंत जाअी मधु ललकारी,
घे जड तनु तिजसवें भरारी,
क्षणाभीतरी
हृदयीं लहरी
अुसळुं लागल्या हर्षाच्या.

तरु-लतिका-गण कुसुमित झाला,
सुगंध पसरे दाहि दिशांला,
होय किती आमोद मनाला !
मंद-समीरण
हळूच येअुन
अुठवी निजल्या हृदयाला.

हिरवें हिरवें रान पसरलें,
दूर दिगंतीं विलीन झालें,
बघुनि तयाला मन अुचंबळे,
हिरवा-सागर
झाला महिवर,
जादू केली घनरायें.

नील नभाचा सागर वरती,
हिरवा सागर पसरे भवती,
मीलन झालें क्षितिजावरती,
स्वर्ग धरेला
पाहुनि भुलला,
भेटायाला ये खाली.

अफाट सागर हा भवताली,
त्यांत जिवाची नाव चिमुकली
हेलकावते वरती खाली,
हाले, डोले
घेअी झोले
तरल तरंगीं स्वच्छंदें.

सळसळतो शेतांतुनि वारा
नाचवितो तो रान थरारा
डोलूं लागे प्रदेश सारा
संसृति-बंधन
विसरे क्षण मन
नाचूं लागे तेंहि तसें.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय

# ४

## कांटा

( जाति–चंद्रकान्त )

आज तयाला अुशीर झाला जाया शेतांत,
भाकर घेअुन जातांना ती दिसली रस्त्यांत.

बाळपणाचा खेळायाचा मौजेचा काळ—
सरला होता, मिळे न आतां बोलाया वेळ.

वृद्ध पित्याचा तो घे अपुल्या शिरावरी भार,
थकली आअी, कामामध्ये ती होअी चूर.

कर्तव्याच्या ओझ्याखाली हृदयभाव दडती,
रिकामपणचे प्रीतिभाव नच हृदयीं सळसळती.

× × ×

हासत बोलत शेतमळ्याच्या मार्गाने जाती,
हरखुनी वदती किति दिवसांच्या अुरलेल्या गोष्टी.

लक्ष न रस्त्याकडे जाहला गुंग बोलण्यांत
कांट्यावरती पाय पडुनि तो शिरला पायांत.

व्याकुळ होअी, बसला खाली, तिथेच मार्गांत,
जुनाट कांटा खुडुनी येअी असतां ओढीत.

बसुनी खाली पाय तयाचा मांडीवर घेअी,
हलक्या हाताने ती कांटा काढाया पाही.

चतुराअीने जीव काम करि तो साधाभोळा,
व्यग्र जाहली, नयनीं झाले प्राण तिचे गोळा.

भान नसे तिज जरी अुडाला पदर तिचा दूर,
किंचित् अुन्नत अुघडें पडलें सहज तिचें अूर.

दुःख विसरला पायांतिल तो, टक लावुनि पाही,
तिच्या मुखावर दृष्टि तयाची खिळूनिया राही.

नवीन काही भाव अुसळला साध्या हृदयांत,
मधुर, तरल, सुखदायक वारें अंगावर येत.

न कळे कांटा केव्हां काढी ती पायांतील,
म्हणे ‘ निघाला कांटा बाअी, किति होता खोल ! ’

पाय ठेवुनी खाली म्हणते ‘ अुठा, चला बाअी,
त्रास होअुनी, व्यर्थ वेळ हा अुगीच किति जाअी, ’

‘ चला ’ म्हणे, तरि तसाच पाहत तिच्याकडे राही,
हळूच धरुनी हात तिचा तो म्हणे तिला काही.

‘ काय निघाला कांटा ? छे ! तो रुतुनि बसे हृदयीं,
आणि वेदना थांबायाची कधी अता नाही.

खोल खोल तो जाअुनि रुतला, तूंच काढशील,
निघेल तरिही गडे, सारखा जीव तळमळेल, ’

तरुण मनाला प्रेम-बोल का लागे शिकवाया ?
स्वर पंचम कां कोकिळास काधि लागे दावाया ?

अपांग फेकुनि दृष्टी, हृदयीं पालविली लाज,
क्षणीं विनटला गालावरती नवतीचा साज.

शुद्ध येअुनी पदर सांवरी दूर गळालेला,
अुरीं शिरुनिया तिच्याहि कांटा खोल खोल रुतला.

नवभावांनी हृदयें त्यांचीं बहरुनिया गेलीं,
अुठलीं, नच बोललीं, चालली मधुसंभ्रमकालीं.

नजर चुकवुनी पहावया तीं परस्परा झटती,
नजरेला परि नजर मिळोनि लाजेने थिजती.

लपंडाव हा खेळत गेलीं दोघें शेतांत,
पायाखालिल न कळे सरली कधी, कशी वाट !

---

## ५

# मीलन

( जाति—साकी )

दोन्ही बाजुंस बांधाच्या हीं अुभीं पाखरें दोन,
किलबिलती हळु, कुजबुजती तीं टवकारुनिया कान.

चाहुल येतां जरा, अुडालीं, पिकांत जाअुन लपलीं,
वृद्ध माणसें दोन वदत हीं बांधावरती आलीं.

सुज्ञ, अनुभवी, जुनीं माणसें, पाहुनी सारें काही,
मनांत हसती, दाखविती की, जणू पाहिलें नाही.

'सावध आपण मोठे' म्हणती 'कसें चकविलें सहज'
हृदय जरासें तरी थरथरे, वाटुनिया भय—लाज.

* * *

बांधाच्या दो बाजुंस करितां कारभारिणी काम,
कितिदा म्हणती, शोभे जोडा 'जणु सीता अन् राम.'

पोरां देखत 'विहिणी' म्हणती परस्परा थट्टेने,
मुग्ध भावना मनांत रुजती सहज अशा वदण्याने

बेत वावुगा न दिसे, स्पष्ट न कारभारि जरि वदती,
सहज अशा या स्थितींत "न मिळे का शेजारीं प्रीती ?"

मधुर मुग्ध भावना प्रांत तों लागे तारुण्याचा,
वृद्ध हासती, विलास पाहुनि प्रेमळ तरुण मनांचा.



मराठी ग्रंथ संग्रहालय

रचित मनोरथ कितिदा दिसती बांधाच्या शेजारीं,
परंतु चाहुल येतां चमकुनि, जशा निसटती खारी.

*   *   *

असेंच आता बघुनी त्यांना, मजेंत पाटिल हसले,
हळूच म्हणतो अेक दुजाला मिचकावुनिया डोळे.

" तुमच्या आंब्याची ही फांदी अिकडे दिसते झुकली,
वेल आमुची आधारास्तव तिच्याकडे ही कलली.

बांध आंतला करी अडथळा, दूर करावें त्याला,
वाढूं द्यावें परस्परांच्या सहवासांत तयांला.

फळाफुलांनी दिसतिल अपणां जधी बहरलेले,
आनंदाने वघतां निवतिल या वृद्धांचे डोळे.

मुहूर्त नाही दूर फारसे, अुडवुन देअूं बार,
' पोळी नाहीं दिली कधीची ' म्हणतें हें शेजार.

भगवानानें जोडा त्यांचा जन्मापासुन केला,
निमित्त आपण हात तयांचे केवळ जुळवायाला."

सहज चालती वृद्ध, फेकुनी दृष्टी साभिप्राय,
प्रिय बाळांच्या हितावाचुनी दिसेल दुसरें काय !

दूर पळालीं, जरी वाटलें, जवळच होतीं लपलीं,
हृदयाचा तीं कान करुनिया अैकत होतीं बसलीं.

—क्षणीं लाजऱ्या मुलांस पकडुनि दोन्ही, आनंदाने
परस्परांचे हात जुळविती, ओढुनि ते प्रेमाने.

---

६

## न्यहारी

( जाति–अभिसारिका )

कलला माथ्यावरुनी दिन,
अुडालें कामावरुनी मन,
फिरफिरुनि पाहतो डोळे तो वळवुन.

डोअिवर पाण्याची घागर
घेअुनी हातामधि भाकर
लगबगा येतसे रस्त्याने सुंदर.

चमकती मोत्यें भाळावर
श्रमाने खालीवर हो अुर
बहरला अुन्हाने गुलाब गालांवर.

सोडला हातांतिल नांगर
फेकले बैलांचें चाहुर
राहिला अुभा तो येअुनि बांधावर.

सहज घे हातावर घागर
हलुच कर ठेवी गालावर
तनुलतिकेवरती विलसे मधुमोहर.

फुले नव मोहर आंब्यावर
कोकिळा गाअी फांदीवर
छायेंत कांवळा पसरी ती सत्वर.

काढुनी कांदा अन् भाकर
ठेविली चटणी पानावर
जलपात्र भरुनिया ठेवी हातावर.

" न्यहारी घ्यावी आटोपुन
सावल्या फिरल्या डोअीहुन "
परि खुळा बघे टक मुखाकडे लावुन.

" नसे का भूक आज लागली ?
रोजची वेळ गडे अुलटली "
सखिं हळूच त्याने जवळ परी ओढिली.

नाचल्या भुवया, डोळे क्षण
हालले ओठ गाल थरकुन
रानफूल हसलें हळूच पानांतुन.

' जोंवरी आली नव्हतिस गडे,
भुकेने पिळवटलें आतडें
तान-भूक हरली बघतां राणीकडे.'

प्रीतिचा भाव मुखीं विलसला,
पाहुनी वदनावरची कळा
श्रम सारे क्षणिं तो दिवसाचे विसरला.

---

## ७

# कळणार कधी !

( जाति–दिंडी )

कारभारिण घेऊन ये शिदोरी
आणि बसलों मी कराया न्यहारी,
जवळ बसुनी ती प्रेमभरें बोले,
"कसे सांगा हें कोरड्यास झालें ?"

"तिखट फारच, भाजलें तोंड भारी."
शब्द माझे हे लागले जिव्हारी.
क्षणीं व्याकुळला जीव तिचा भोळा,
आणि झाले डोळ्यांत प्राण गोळा.

जवळ ओढुनि ठेविलें ओठ ओठीं,
"गोड आता रुचि कोरड्यास मोठी,
तिखट त्यांतिल गे, गोड करायाला
अशी द्याया फोडणी हवी त्याला."

भोंवताली दचकून जरा पाही,
लगबगीने जवळून दूर होई,
म्हणे ओठामधि "बरें असें नाही
तुला राया, कळणार कधी बाई ?"

---



मराठी

## ८

# चिमुकलें जग

( जाति–केशवकरणी )

गुंग अुभयता निंद्ण्यांत, तों येअी पाअुससरी,
गार ये वारा अंगावरी.
झाडाखाली गेलीं, फेकुनि कांबळ त्याच्याकडे
म्हणे ‘ घ्या अंगावर हें गडे, ’
तो बघे तियेची देह्लता सांवळी,
थरथरे हुडहुडी भरतां तनु कोंवळी,
क्षणिं कांबळांत ‘ ती ’ त्याने गुंडाळिली,
कृष्ण कांबळामधे मुख दिसे प्रफुल्ल कमळापरी
पाहुनी संतोषे अंतरीं.

थरथरतांना बघे तया ती, भरे अंगिं हुडहुडी
जरी तो राकट कणखर गडी.
अुघडें भंवती रान, विसरली कृत्रिमतेचें जिणें
झुगारी लाज–भीड–बंधनें.
आवेगें त्याला कांबळांत ओढिलें,
दोघांस पुरेना कांबळ तें चिमुकलें.
तिज कुशींत त्याच्या अूब प्रीतिची मिळे.
‘ अमर्याद जग ’ म्हणती पंडित, काय तयांना कळे
मावलें कांबळांत चिमुकलें.

---

## ९

# जीवित–पूर्ति

( जाति–अभिसारिका )

वरी ये दिवस कासराभर,
पतिकरीं बांधुनि दे भाकर,
निज–शिरीं अुचलुनी बाला घे घागर.

अुभयता शेतामधि चाललीं,
–अनुसरे देहाला सांवली,
गावशीव मार्गें जातां ओलांडिली.

फिरवुनी नजर चहू–बाजुंला
चालतां युवक पथीं थांबला,
घट घ्याया त्याने वलुनी कर लाविला.

"असूं दे" सलज्ज वदली जरी
बळें घे घागर अपुल्या शिरीं,
हातची शिदोरी देअी तिचिया करीं.

धन्यता बालेला वाटली,
मुखावर अरुणश्री थाटली,
तिज जीवित–पूर्ति क्षणीं गमे जाहली.

२

१०

# पेरणी

( जाति–दिंडी )

पेरणीचे दिन जवळ जसे आले
हृदय त्याचें दुःखांत चूर झालें.
नसे दाणा पेरणी करायाला,
आणि पुढचें काही न सुचे त्याला.

गरजवंताचें दुःख हरायाला
दक्ष शेजारी शेट मिळे त्याला.
गरज त्याची नेतसे भागवून,
मात्र घेओी आंगठा अुमटवून.

करी हर्षें पेरणी योग्य काळीं,
म्हणे 'गरिबाचा देव असे वाली'
'दयाळू त्या शेटास सौख्य द्यावें'
म्हणुनि प्रार्थी देवास मनोभावें.

मनाजोगी पेरणी आज होओी,
शेट कागद पेटींत जपुनि ठेवी,
जरी कधिही बरसात नच जहाली
पीक त्याचें येणार योग्य वेळीं.

पीक शेतांतिल फुलुनि यावयाला
मेघराजाची कृपा हवी याला.
मेघरायाचा रोष जर जहाला
बहर त्याच्या ये खरा मग पिकाला.

---

## ११

# बांधावर

( जाति–केशवकरणी )

बांधावरती अुभा राहुनी शेताचा मालक
बघतसे सृष्टिरूप मोहक.
हिरवा शालू नेसुनिया ही नटे सृष्टि-देवता,
हरपलें भान, रूप पाहतां.
कडव्याचें हें शेत पसरलें, हिरवें हिरवें दिसे,
डोलतें वाऱ्यावर तें कसें !
अमोल हृदयीं मोत्यें म्हणुनी ताटें हीं डोलती,
अशी का हर्षानें नाचती ?
गातात धुंद खग वृक्षशिरीं नाचुनी,
सळसळुनी वारा वाहे शेतांतुनी,
आनंद अुसळतो पानापानांतुनी,
पिकास आलें शेत, नाचतें वाऱ्यावर तें जसें,
तयाचें हृदयहि नाचे तसें.

कोपऱ्यांतल्या खोपटांतुनी, हळुच दार अुघडुनी,
पिकांतुनि वनदेवी ये कुणी.
हिरवें लुगडें साधें, अंगीं तंग कंचुकी असे,
कपाळीं सूर्यबिंब नव दिसे.

अटकर बांधा, टपोर डोळे, रंग सांवळा जरी,
तेज नव अुसळे देहावरी.
भोवतालच्या सौंदर्याचा विसर पडे त्या क्षणीं,
मुखीं ये गीत, हृदय अुसळुनी.
" ही शिवार-शोभा तव रूपाने गडे,
गरिबाचें माझें नटवितसे झोपडें,
पसरिते चहुकडे धनधान्याचे सडे,
समृद्धि-देवी अशी नांदते ज्याच्या सदनांतुनीं
तुच्छ तो राजपदाला गणी ! "

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६७०८

१२

## अम्हांला काम सुचेना गडे !

( जाति–मनी )

बघा न अमुच्याकडे—अम्हांला
काम सुचेना गडे !

लागतें न जों निंदायाला,
काम काढुनी त्या बाजूला
येतां, न दिसे तण डोळ्यांला
बघतां तुमच्याकडे—अम्हांला

दूध गायिचें काढित असतां
घालाया तिज चारा येतां,
धार दुधाची तुम्हांस बघतां
पडते भलतीकडे—अम्हांला

लागतांच मी धुणीं धुवाया
तुम्हां सांपडे कसें यावया ?
अेकाअेकी भिजते काया,
पाणी कोठुनि पडे !—अम्हांला

भाजी चिरतां बिळी घेउनी,
स्वारी बसते पुढे येउनी,
बिळीवरी तों भान हरपुनी
बोट गडे सांपडे—अम्हांला

लावित असतां दिवा, येउनी
विझवी फुंकर कोण घालुनी ?
काळोखामधि कवळी धरुनी,
हृदय किती धडधडे—अम्हांला

पळ्हें वेचितों कधी मैत्रिणी,
काम व्हावया म्हणतों गाणीं,
तोंच येतसे स्वारी दिसुनी,
शब्द आमुचा अडे—अम्हांला

दिसतां, कधि मी लक्ष न देईं,
काम सारखें करीत राहीं,
कोण लक्ष वळवाया पाही—
फेकुनिया हो खडे ?—अम्हांला

सदा भोंवती कां घुटमळतां ?
काम आपुलें टाकुनि फिरतां.
गोंधळांत का मना पाडतां ?
भलतें हें सांकडें—अम्हांला
काम सुचेना गडे.

—



मराठी ग्रंथ

१३

# युगत ( युक्ति )

( जाति–साकी )

" आज कुणिकडे मधेच अिकडे पाअुल अपुलें वळलें ? "
बघुनि जावअी बांधावरती, त्यास सासरा बोले.

" गाय हरवली कपिला, तिजला फिरतों शोधायाते
दिसली का ती तुम्हांस अिकडे रानीं चरतां कोठे ? "

" न्यहारिची ही वेळ भाकरी घ्या थोडी खाअून
जा मग, जवळच असेल, नच ती जाअिल दूर पळून "

आढेवेढे घेअुनि थोडे, न्यहारीस तो राही,
आणि मनांतिल हेतु तयाचा पुरा अेकदा होअी.

माणूस त्याचें दिसून आलें, सफल अपेक्षा झाली,
अितर न्यहारी करिती, यांची तहानभूक निमाली.

दर्शन होतां परस्परांचें, हसले त्यांचे डोळे,
आणि तयांची अेकसारखी नेत्रपल्लवी चाले.

भाकर खाअुनि निघे, जाअुनि व्रल्लीपाशी वळला,
नजर चुकवुनि सर्वांची ती येअी त्या स्थानाला.

" कळलें मजला कां फिरते ही अशी अिकडची स्वारी !
स्वभाव पुरता ठाअुक, अधिरा जीव आपुला भारी !

काय हरवली गाय आपुली ! युगत आपुली कळली,
कुणी वळविली या बाजूला ? सांगा कां ती आली !

सोंगढोंग हें केलें आपण, कां तें कळलें मजला,
बरें नसे हें असें भेटणें चकवुनिया वडिलांला !

चार दिवस नच झाले मजला येअुनि माहेरास,
तोंच कराया धाडस असलें रुचलें केवि मनास ?

अधीर-वृत्ती पुरुषजातिला अगदी शोभत नाही,
कळलें जर अितरास काय ते म्हणतिल सांगा बाअी "

" पुरे पुरे ग ! कळे मजहि तूं किती धीर गंभीर
वृत्ति साजणी अुघड करितसे वदनावरचा नूर.

अुपदेशाचा आव पोक्त जणु आणी आजीबाअी,
व्याकुळता-अुत्कंठा-तळमळ नयनीं दिसुनी येअी.

वडील-भाअू-भावजयीला कां आलिस चुकवून ?
काय काम तव बांधाशी या राही सांग अडून ?

कां सर्वांचा चुकवुनि डोळा खुणाविलें तूं मजला ?
हलुच कोपरा कां हा खुणवुनि, सांग मला दाखविला.

भेटायाची तुला साजणी, अुत्कंठा जर नाही,
कामाला मी जातों अपुल्या, तूंहि परतुनी जाअीं. "

चोराचीं पावलें ओळखी सहज सवाअी चोर,
कोण कुणाला पकडायाला सांगा मग झटणार !

अुंच भोवती पीक, शिरे ती हळूच धरुनी हात,
बंद बोलणें करी, ठेवुनी ओठावरती ओठ.

आणि क्षणाने पिकामधुनि तो हासत बाहिर आला
सहज सांपडे गाय, घेअुनी घराकडे मग वळला.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय

## १४

## कारभारीण

( जाति–फुलवेल )

कुठेही न्यून—दिसुं दे न कारभारीण.

पहाट–तारा दिसावयाला
जों न लागतो तों सर्वांला,
अुठवुनि लावी ही कामाला,
वेळ पाहून—वागते कारभारीण.

लावुनि बाया निंदायाला
तण अुरतें कां पहावयाला
नजर आपुली चहुबाजूंला
फिरवुनी तीक्ष्ण—निराखिते कारभारीण.

मजुरीचा मनिं कयास करुनी
मजुरांना दे आथ ठरवुनी,
काम घेतसे चोख करवुनी
फिरे मागून—सारखी कारभारीण.

कापुस, शेंगा तोलुन घेअी,
लाणी होतां कणसांनी ही
स्वतःच हारा भरुनी देअी,
खूष होअून—दिलदार कारभारीण.

झालें कीं नच दाणापाणी
स्वता जाउनी करी पहाणी.
बैल-वासरें कुरवाळूनी
गाय पाहून—आणते कारभारीण.

पीक पेरणें, कुठे कोणतें
धोरण राखुन हीच ठरविते.
बी निवडुनिया स्वता आणते
नीट पाहून—शाहणी कारभारीण.

मजुरी साऱ्या आठवडयाची
जंव सर्वांची चुकवायाची
चूक न होऊं दे पैशाची,
हिशेब करून—देतसे कारभारीण.

नोकर-चाकर-मजूर-बाया
झटती तिजला खूष कराया,
कुणी न अिच्छी तिज दुखवाया,
मातेसमान—मानिती कारभारीण.

भोवतालच्या शेतवाडिची
आणि धन्याच्या या वाडयाची
मिळे मालकी मुखत्यारीची
तिला संपूर्ण—ती खरी कारभारीण.

सासुसासरे-धनी-दीर या
झटली रात्रंदिन सुख द्याया
सेवा केली सतत श्रमुनिया
अंग मोडून—म्हणुनि हो कारभारीण.

---

१५

## केळीच्या बागेंत

( जाति–मेनका )

मोट धनि विहिरीवर वाही.
बैल चालतां, गोड लावणी तालावर गाओी.
झुळझुळे दांडांतुनि पाणी,
तरुवेलींचें जीवन साचें, गोड सुधेवाणी.
धरितसे केळवनीं बारीं,
पोरवयाची धनीण त्याची केळीहुनि गोरी,
त्यांतली केळ तीहि वाटे.
हिरवी नाटी, हिरवी चोळी, खुलवी अंगातें.
दिसे तिज केळ वाढलेली,
नव्या दिलेल्या केळफुलानें जरा वाकलेली.
धाव ती विहिरीवर घेओी,
मोट थांबवुनि, ओढुनि आणी धन्यास लवलाही.
" बघ केळीने या केळफूल हें दिलें.
किती सुंदर कवळें ! केळ कशी ही खुले !
पहिलेंच कमळ हें अपुल्या बागेंतलें. "
हासती गोड तिचे डोळे.
ओूर दाटलें हर्षानें, मुखकमल तिचें खुललें.

“ अुगा तूं बोलत कां नाही ?
पाहुनिया ही सांग तुला का आनंद न होअी.
हासते गोड किती पाही !
केळकमळ नच, बाळ तिचें ती कडेवरी घेअी.
स्तब्ध कां ? बोल गडे, काही.
हृदय तुझें का बघुनि न तिजला वेडावुनि जाअी ? ”
धरुनिया हात तिचे दोही,
टक लावुनि तो तिच्या हासऱ्या मुखाकडे पाही.
जरा मग मुखास वरि अुचली,
म्हणे “ केळ ही केळफुलाने खचित गडे नटली.
परी मन ओढुनिया घेअी,
केळ कोंवळी माझी तिजहुनी, वेड मला लावी.
जंव केळफूल या केळीला येअिल;
मग हर्ष मनाला सांग किती होअिल !
तें हृदया अमुच्या गोड वेड लाविल.”
संभ्रमें गोड गोड लाजे,
लपवी त्याच्या कुशींत मुख जें नवतीने साजे.

१६

# ओळख

( जाति—चंद्रकांत )

बालपणीं जाहलें लग्न, तिज काधि केव्हां न कळे,
'पणांत येतां' आज सासरीं तिजला पाठविलें.

प्रीतीचीं माणसें सोडुनी दूर जीव येअी,
चुकलेलें हरिणीचें पाडस बावरून जाअी.

ओळख नव्हती तिची कुणाशी, जग नवखें सारें.
कसें व्हायचें ? मनांत भरलें भीतीचें वारें.

" दिला पित्याने ज्याच्या हातीं जन्माचा हात,
होइल तो आधार नाकळे करील की घात.

सुखदुःखाशी समरस होअिल, हृदया लावील,
की अवगणुनी, झिडकारुनि तो पायीं तुडवील."

काम करी शेतांत परी मन नव्हतें कामांत,
विळा लागुनी, बोट कापलें, वाहतसे रक्त.

धावत येअी सासू, फाडी वस्त्र भाकरीचें
बोट बांधतां हृदय आढळे प्रेमळ मातेचें.

" घेअुनि थोडें गवत घरीं जा, पेटिव तूं चूल,
आम्ही येतों काम झडकरी आटोपुनि बाळ,

बोट कापलें, दुःख न त्याचें धीर मना आला,
माता लाभे, अुचलुनिया जी लाविल हृदयाला.

बांधुनि भारा शिरावरी जो अुचलाया लागे,
जड बहु होता, प्रयत्न करितां जीव तिचा भागे.

भवती पाही, कामामध्ये गुंग सासुबाअी,
हाक कसें मारावें ! न कळे भांबावुनि जाअी.

पहात नाहीं कोणी खात्री अशी करुन घेअी,
आतुर नयनें मधुनि मधुनि तो तिच्याकडे पाही.

संकट कळतां, हळूच ये तो भवती पाहून,
तिच्या शिरावर जपून ठेवी भारा अुचलून.

तिच्या लाजऱ्या हसऱ्या नयनीं रोखुनिया पाही,
हृदयभाव प्रगटला मनोहर गालांवर दोही.

क्षणांत त्याची हृदयभावना तिला कळुनि आली,
संकोचाने अन् लाजेने दृष्टि वळे खाली.

थरथरणारा हात घेतला हळूच हातांत,
आणि कापल्या बोटावर तो ठेवितसे ओठ.

कर, सोडुनिया क्षणीं जातसे कामाला दूर,
हृदयभावना–नदीस येअी तिच्या महापूर.

हृदयावरचें भावि–काळचें ओझें शंकेचें,
निमिषामध्ये अेका गेलें लयास कायमचें.

हृदयाकाशामधले पळती ढग सारे काळे,
आशेच्या नवताऱ्यांनी तें सर्व भरुनि गेलें.

फुलली, खुलली, हसली, नटली, वहरे तनुवेल,
डोक्यावरचा अवजड बोजा वाटतसे फूल.

वृत्ति हरखली, ढगांत विहरे तनु वारेमोल,
जीवाचें राजीव विकसलें, नाचे अुत्फुल्ल.

जिवाशिवाची ओळख पटली साता जन्माची,
सुमुहूर्तांची तीच सुमंगल घटिका लग्नाची.

तशा भारल्या स्थितीमधे ती घराकडे जाअी,
मृदु सुमनांचा गमे गालिचा आंथरला पायीं.

---

१७

## त्या शेतकऱ्याची दिवाळी

[ शेतकऱ्यांचीं पिकें दिवाळीच्या सुमारास येतात व नेमकी ती संधि साधून सावकार त्यांचे घरावर जप्ती ( टांच ) आणतात. ]

( जाति–दिंडी )

खपे रात्रंदिन जरी अर्धपोटी,
कधी लागेना घास गोड ओठीं,
होअि यंदा बरसात योग्य काळीं,
आणि भूमाता सुप्रसन्न झाली.

हर्षवेडा हा शेतकरी झाला,
अुद्या दिपवाळी, बेत गोड केला.
पोट भरुनी खातील मुलेंबाळें
विचाराने तो हर्षभरें डोले.

करुनि धान्याची खळ्यामधी रास,
‘ शेतमालिक ’ हा बघे मुदें तीस.
तोंच साधुनि ये संधि सावकार
टांच घेअुनि, करि जप्त धान्यभार.

दीपमाळांनी खुले अवसरात
अवस त्याच्या परि भरे अंतरांत;
भरे अश्रूंनी दृष्टि, अंध होअी,
कोण त्याला आधार–हात देअी ?

## १८

# पयोदान

[ जाति–माधवकरणी ]

अून धरितसे रोप कोंवळें काल लावलेलें,
गळुनिया मलूल तें झालें.

करीं घेअुनी ही पाण्याने घागर भरलेली
द्यावया जीवन त्या आली.

होतांच अुन्हाचा ताप
लागलें जळाया रोप,

मातृहृदय तळमळुं लागे
वात्सल्य जाहलें जागें,

कोंवळें हृदय नवनीत
—प्रेमाने धावे तेथ.

गुणगुणे मुखाने काही,
गातसे गोड अंगाअी.

वात्सल्याची मूर्ती केवळ ही नारीजात
अुरीं मातृत्व जन्मजात.

हलुवारपणे मुळास घाली ओंजळिने पाणी
मृदुकरें रोप सावरोनी.

जीवन लाभे प्रेमें जंव ती करी पयोदान,
क्षणीं तें धरीतसे मान.

संजीवन त्यास मिळालें
वाऱ्यावर नाचे डौलें,

अमृताची पडतां चूळ,
तें रोप धरितसे मूळ.

मायेचा फिरतां हात
नवजीवन होआी प्राप्त.

प्रेमाची पडतां दृष्टि
बदलून जातसे सृष्टि.

कोण न गाआी मातृत्वाची दिव्य, थोर महती ?
जगाला जगवी सत्प्रीति.

---

१९

## मजूर

( जाति—फुलवेल )

तडफडे प्राण—हो व्याकुळ अन्नावीण
जीर्ण फाटकीं वस्त्रें भिजलीं,
घर्मबिंदु टपटपती खालीं,
जमीन तळची ओली झाली,
श्रमे, परि प्राण—हो व्याकुळ अन्नावीण.

खोल कितितरी गेले डोळे,
कुठे दडाले गाल ना कळे,
नाकाचें तर हाडच उरलें,
तळमळे प्राण—हो व्याकुळ अन्नावीण.

धूळ सांचली केसावरती,
मळकट करडे स्वैर वाढती,
तेलाची कधि ओळख नव्हती,
कामकरि दीन—हो व्याकुळ अन्नावीण.

रात्रंदिन कामास जुंपला,
अन्न पोटभर नसे तयाला
हाडांचा सांपळाच उरला,
देहिं न त्राण—हो व्याकुळ अन्नावीण.

बसे जरा जों जीव भागला,
येओी झणिं साहेब त्या स्थला,
लाथ बुटाची हाणी, पडला—
झोक जाऊन—हो व्याकुळ अन्नावीण.

* * *

शेत चिमुकलें सोडुनि येओी,
गिरणीमधला मजूर होओी,
अनुभव तेथे भलता येओी,
रक्त जाळून—जगवितो कसातरि प्राण.

---

## २०

# हासुनि युवक वळे

[ जाति—अंजनी ]

प्रलयकाळचा सुटला वारा,
धूळ अुसळली, जीव घाबरा,
अुचली बाला पाय झरझरा
घराकडे जाया.

घन जमले नभिं काळे काळे,
वीज कडाडुनि अचपळ चाले,
कडकड तडतड तरुगण बोले,
जलधारा गळती.

सावरितां ती वसनें, थकली,
घागर डोक्यावर भरलेली,
गमे क्षणीं ती पडेल खाली,
झोक जाअुनीया.

अंधकारल्या दिशा दहाही,
कोठे जावें? कळे न काही,
देवाजीला मनांत बाही,
व्याकुळ हृदयानें.



मराठी ग्रं...

“आलों आलों” शब्द अुमटला,
स्वरें सुपरिचित धीर वाटला,
तोंच करीं कुणि मृदु कर धरिला
घराकडे नेअी.

घाबरली भयचकिता हरिणी
जपून नेअी हात देअुनी,
घराजवळ ती सोडि आणुनी,
दूर अुभा राही.

अंगावरचें पातळ ओलें,
केस वेणिचे जे विस्कटले,
काही त्यांतिल वदनीं आले,
मोत्यें ओघळती.

अंगा ओलें वस्त्र चिकटलें,
कंपित मृदु तनु थरथर हाले,
भयें फिकटसे गाल जाहले,
तेज नुरे नयनीं.

जादु औेर त्या दृश्यीं काही,
अुन्मादक अनिमिष नयनांहीं,
तिच्याकडे नव युवकहि पाही—
टक लावुनि वदनीं.

दारांतुनि ती शिरतां सदनीं,
अेकच फेकी कटाक्ष वळुनी,
श्रम-सार्थकता होतसे क्षणीं
हासुनि युवक वळे.

———

## २१

# लक्ष्मी

( जाति–भूपतिवैभव )

बसवून न्यहारी करावया आम्हांला,
बघ सून पांखरें जाओी हाकायाला.

हा दिसे पिकाचा हिरवा सागर भवतीं
माळचा दिसे हा कृष्णकमळ त्यावरती.

त्यावरी अुभी ही साक्षात् देवी लक्ष्मी,
पांखरें हाकते अपुल्या घरची लक्ष्मी.

घेतसे जन्म ही वाटे कुळपुण्याओी,
येअुनी आपुल्या घरास शोभा देओी.

ही आल्यापासुन बरकत अपुली होओी,
कधि धनधान्याचें अुणें भासलें नाहीं.

कोरडी भाकरी तिच्या हातची खाओीं,
अमृताची गोडी तींत आढळुनि येओी.

तिजकडे पाहतां मनांत शंका येते,
लागेल दृष्ट तिज आपुलीच की वाटे !

हीं सुखांत नांदत असतां दोन्हीं बाळें
प्रार्थना मिटावे प्रभुने अमुचे डोळे.

---

## २२

# माझी देवी

( जाति–सूर्यकान्त )

ती—कशी टवटवी पाउस येतां पिकावरी थाटते ?
तो—अधिक मुखीं तव, विरहानंतर मला पाहुनी नटे.

ती—शेंग लागली पहा जरा ना किति या चवळीवर
तो—ही चवळीची शेंग त्याहुनी नसे काय सुंदर !

ती—आलिंगी या आंब्याला ही वेल, दिसे साजुन,
तो—गळ्यांत माझ्या मिठी घालतां शोभतेस त्याहुन

ती—कपासबोंडें फुलतां तारे ढगांतले वाटती.
तो—डोळ्यांच्या ह्या तुझ्या चांदण्या सुंदर त्याहुन किती.

ती—गोड गातसे किती कोकिळा मन जाओी मोहुनी,
तो—जात्यावरची ओवी तव परि गोड किती त्याहुनी.

ती—वसंत येतां खुलल्या वेली कशा बहर येउनी !
तो—तव नवतीचा वसंत खुलवी देहवेल फुलवुनी.

ती—आंब्याला या वसंतांत किती गोड लागती फळें !
तो—अमृत नेहमी या ओठांतिल मला प्यावया मिळे.

ती—मऊ गालिचा गवताचा सुख थकल्यावर देतसे,
तो—मांडीवर तव पडतां सुख गे अधिक मला होतसे.

ती—फुलांभोवती भुंगा फिरतो कसा अेकसारखा !
तो—मीहि सदा तुजभवती फिरतों तुझ्या पाहुनी मुखा.

ती—देवदयेने सुपीक शेती जन्मभरी लाभली.
तो—जन्मोजन्मीं अपुली प्रभुने गडे, गाठ बांधिली

ती—धरतीदेवी अुदार देअी हृदयामधलें धन,
तो—देवी माझी हृदयच अपुलें मज टाकी देअुन.

---

२३

## घरधनीण

( जाति–केशवकरणी )

काम भराभर करि यंत्रापरि धनीण मम पाहुनी,
विसरतों काम हातचें क्षणीं.
थंडी–वारा–पाउस–उनही अडवाया तिज कधी,
शक्त ना असतां कामामधी
गुलाब-कमळें कशीं टिकावीं उन्हामधे राबतां ?
सांवळा रंग खुलवि चारुता.
हें जाड सुताडें खुपे न अंगावरी,
कोरडी अडेना घशांत कधि भाकरी,
नच कुढे न फुटका अंगावर मणि जरी,
साधेंभोळें राकट कणखर हृदयान्तरिं कोमळ,
पांखरूं माझें रानांतिल.

लचकत मुरडत पदर सावरित चालायाची तऱ्हा,
ठाउकी नसे रानपांखरा.
'नाजुक पाउल' तुडवी माती-दगड-खडे जरि सदा,
येइना रक्त तयाला कदा.

मनांत काही, वदनीं दुसरें, कृतींत भलतें दिसे,
कला ही अवगत तिजला नसे.

नच लाजे भलता पुढे उभा पाहुनी,
परि करुनि वांकडा डोळा बघतां कुणीं,
थोबाड तयाचें फोडिल ' अबला ' क्षणीं,
खुल्या दिलाची
सरळ मनाची
धनीण फटकळ जरी
चालवी सत्ता हृदयावरी.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय

## २४

# आधार

( जाति–चंद्रकांत )

हंगामाचे, दिन कष्टाचे परंतु भाग्याचे,
श्रम वर्षाचे सफळ व्हायचे, अतिशय मोलाचे.

शेत पिकविलें करुनि वर्षभर पाणी रक्ताचें,
पीक सुगीचें शेतांतिल दिन घरिं आणायाचें.

अेकसारखी सेवा केली धरती–मातेची,
तृप्त होअुनि अुधळणूक करि हृदयसंपदेची.

मरावयासहि शेतकऱ्याला नच गवसे वेळ,
लहानमोठे श्रमती सर्वहि बघुनि काळवेळ.

खूप थाटलें शेतामध्ये पीक जोंधळ्याचें,
जमले सारे काम कराया आज कापणीचें.

आथ घेअुनी कापुं लागले कडबा अिर्षने,
पुढे जावया पाही जें तें झटुनी चुरशीनें.

" होअिल तितकें काम करी तूं, हें अवघड बाअी,
धडपड करितां दमशिल, पडशील करूं नको घाअी.

दंगा यांचा चालायाचा असाच हा आता,
नादी लागूं नकोस " सांगे सासु न जणु माता.

आथ घेअुनी तिच्या जवळची, तो चतुराअीने,
विळा चालवी अेकसारखा कुशल सफाअीने.

जबर गडीही काम त्यासवे न टिके करण्याला,
आज परंतू त्यास जुळेना पुढे जावयाला.

पोर नवशिकी, परी जातसे पुढेच कापीत,
अुणें राहिना कामामध्ये, गमे सराअीत.

( ' असें कसें हें ? सांगायाला नलगे रसिकांला
हें प्रेमाचें कळेल कोडें प्रेमळ हृदयाला. )

सायंकाळीं काम संपवुनि घराकडे आले,
' कोठे ठेवूं सून गुणाची ' सासूला झालें.

" असेल दमली कवळी, नाजुक ही अमुची बाअी,
अवघड कामामधेहि आम्हां हार न ती जाअी. "

कुरवाळुनिया सूनबाअिला ' स्वस्थ बैस ' सांगे,
चूल पेटवुनि स्वता भाकरी करावया लागे.

घरांत अेकीकडे गाठुनी हळूच तो बोले,
" आज एक माणूस स्तुतीने वेडावुनि गेलें.

अेक जणीवर बहाल मर्जी सासूबाअीची—
आज जहाली, राहिल ओळख का या दासाची ? "

काय वदावें न कळे, झाली लाजेने लाल,
आणि तयाची वृत्ती अवखळ होअी बेताल.

हळूच ओढुनि जवळी, कानीं कुजबुजला काही,
गोड खुलावट अधिक रंगली गालावर दोही.

## २४

# आधार

( जाति–चंद्रकांत )

हंगामाचे, दिन कष्टाचे परंतु भाग्याचे,
श्रम वर्षाचे सफळ व्हायचे, अतिशय मोलाचे·

शेत पिकविलें करुनि वर्षभर पाणी रक्ताचें,
पीक सुगीचें शेतांतिल दिन घरिं आणायाचें.

अेकसारखी सेवा केली धरती–मातेची,
तृप्त होअुनि अुधळणूक करि हृदयसंपदेची.

मरावयासहि शेतकऱ्याला नच गवसे वेळ,
लहानमोठे श्रमती सर्वहि बघुनि काळवेळ.

खूप थाटलें शेतामध्ये पीक जोंधळ्याचें,
जमले सारे काम कराया आज कापणीचें.

आथ घेअुनी कापुं लागले कडबा अीर्षेने,
पुढे जावया पाही जें तें झटुनी चुरशीनें.

" होअिल तितकें काम करी तूं, हें अवघड बाअी,
धडपड करितां दमशिल, पडशील करूं नको घाअी·

दंगा यांचा चालायाचा असाच हा आता,
नादी लागूं नकोस " सांगे सासु न जणु माता.

आथ घेअुनी तिच्या जवळची, तो चतुराअीने,
विळा चालवी अेकसारखा कुशल सफाअीने.

जबर गडीही काम त्यासवे न टिके करण्याला,
आज परंतू त्यास जुळेना पुढे जावयाला.

पोर नवशिकी, परी जातसे पुढेच कापीत,
अुणें राहिना कामामध्ये, गमे सराअीत.

( 'असें कसें हें ? सांगायाला नलगे रसिकांला
हें प्रेमाचें कळेल कोडें प्रेमळ हृदयाला. )

सायंकाळीं काम संपवुनि घराकडे आले,
'कोठे ठेवूं सून गुणाची' सासूला झालें.

" असेल दमली कवळी, नाजुक ही अमुची बाअी,
अवघड कामामधेहि आम्हां हार न ती जाअी."

कुरवाळुनिया सूनबाअिला 'स्वस्थ बैस' सांगे,
चूल पेटवुनि स्वता भाकरी करावया लागे.

घरांत अेकीकडे गाठुनी हळूच तो बोले,
" आज एक माणूस स्तुतीने वेडावुनि गेलें.

अेक जणीवर बहाल मर्जी सासूबाअीची—
आज जहाली, राहिल ओळख का या दासाची ?"

काय वदावें न कळे, झाली लाजेने लाल,
आणि तयाची वृत्ती अवखळ होअी बेताल.

हळूच ओढुनि जवळी, कानीं कुजबुजला काही,
गोड खुलावट अधिक रंगली गालावर दोही.

विशाल छातीवरी ठेवुनी ती डोकें अपुलें.
दृष्टि लावुनी मुखा बघे, तों ओठ तिचे हलले.

" अुणीव दिसतां अशी पुढेही, घ्या सांभाळून
हेंच सांगणें या दासीचें तुम्हांस विनवून. "

कवटाळुनिया हृदयाशी, तो देअी तिज धीर
वदे प्रीतिचे बोल साठलें ज्यांत सर्व सार.

" प्रेमाच्या माणसास सजणी, दुःख निवारून–
सुख द्यावें, हें सत्प्रेमाचें लक्षण गे जाण.

जिवलग आपण परस्परांचे–न्यून–झाकुनीया,
झटूं सखे ग, इतरा अपुले सद्गुण दावाया. "

---

२५

## संजीवन

( जाति–माधवकरणी )

भरीव छाती, रक्त खळाळे, नवतीचे देहीं,
श्रमाची पर्वा नच काही.

गवताचा शिरिं घे भारा, जड जो दोघांनाही,
निघाला घरास लवलाही.

किती वाढली तरी मानवी असीम नच शक्ति
असे तिज मर्यादा अंतीं.

ओझ्याखाली खचली कणखर काठी देहाची,
कांबही थरके पायाची.

श्वास भरुनिया अफाट छाती फाटुनिया जाओी,
जीव तो खालीवर होओी.

तसाच चालत गेला, फेकी दारामधि भारा,
वाहती अंगांतुनि धारा.

श्वास सोडुनी, व्याकुळ टाकी देह अंगणांत,
पडे तनु निश्चल निमिषांत.

औकुनिया आवाज घरांतुन धनिण धाव घेओी,
पाहुनी भयविस्मित होओी.

४

विशाल छातीवरी ठेवुनी ती डोकें अपुलें.
दृष्टि लावुनी मुखा बघे, तों ओठ तिचे हलले.

" अुणीव दिसतां अशी पुढेही, घ्या सांभाळून
हेंच सांगणें या दासीचें तुम्हांस विनवून. "

कवटाळुनिया हृदयाशी, तो देअी तिज धीर
वदे प्रीतिचे बोल साठलें ज्यांत सर्व सार.

" प्रेमाच्या माणसास सजणी, दुःख निवारून–
सुख द्यावें, हें सत्प्रेमाचें लक्षण गे जाण.

जिवलग आपण परस्परांचे–न्यून–झाकुनीया,
झटूं सखे ग, इतरां अपुले सद्गुण दावाया. "

---

## २५

# संजीवन

( जाति–माधवकरणी )

भरीव छाती, रक्त खळाळे, नवतीचे देहीं,
श्रमाची पर्वा नच काही.

गवताचा शिरिं घे भारा, जड जो दोघांनाही,
निघाला घरास लवलाही.

किती वाढली तरी मानवी असीम नच शक्ति
असे तिज मर्यादा अंतीं.

ओझ्याखाली खचली कणखर काठी देहाची,
कांबही थरके पायाची.

श्वास भरुनिया अफाट छाती फाटुनिया जाअी,
जीव तो खालीवर होअी.

तसाच चालत गेला, फेकी दारामधि भारा,
वाहती अंगांतुनि धारा.

श्वास सोडुनी, व्याकुळ टाकी देह अंगणांत,
पडे तनु निश्चल निमिषांत.

अैकुनिया आवाज घरांतुन धनिण धाव घेअी,
पाहुनी भयविस्मित होअी.

४

अुचलण्यासहि न गडी घजावा जबर, असा बोजा
घेअुनि येअि तिचा राजा.

तोंच दिसे तिज निश्चल पडला विकलगात्र नाथ,
धावली वेगाने तेथ.

अुचलुनि डोकें मांडीवर ती घे आवेगाने,
पुसे मुख त्याचें पदराने.

वळवुनिया मुख जरा अुचलुनी हृदयाशी घेअी,
त्याकडे प्रेमाने पाही.

प्रेमळता हृदयसखीची
अन् वत्सलता मातेची,
व्याकुळता स्त्रीहृदयाची
आतुरता नवतरुणीची,
साठली तिच्या दृष्टींत
विश्वांतिल सारी प्रीत.
दृक्क्षेप करी क्षणि शांत
तनु विकल, लया श्रम जात.

नवजीवन निमिषांत लाभलें, संजीवन ओती
क्लान्त त्या देहीं सत्प्रीति.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६१८८

## शेतकऱ्याचें दैवत

( जाति–चंद्रकान्त )

पहा सजविले कसे देव हे परधान्या राजा !
करावयाची आज तयांची सर्वांनी पूजा.

राबराबले रात्रंदिन ते अपुल्या शेतांत,
दिवस:सुखाचे त्यांच्या–योगें अपणां मिळतात.

आनंदाचा सण हा त्यांचा आज असे पोळा,
विश्रांतीचा त्यांना अेकच दिन वर्षामधला.

* * *

हिंगुळ लावुन कशीं तयाचीं रंगविलीं शिंगें !
बेगडिचीं त्यावरी बांधिलीं सुंदर बाशिंगें.

माथ्यावर रंगीत सुताची माथोटी साजे,
पायीं पैंजण खळखळणारें गोड कसें वाजे !

घुंगुरघंटा नव्या आणल्या ह्या त्यांच्यासाठीं,
नव्या सुताच्या गेठ्यामध्ये शोभतात कंठीं.

मान हालतां रुमझुम होअी जो घुंगुरनाद,
हृदयामधल्या गाण्याचा तो मंजुळ पडसाद.

झुला काढुनी आज घातल्या ह्या त्यांच्यावरती,
चहुबाजूंला गोंडे बघ किति सुबक लोंबकळती.

रुओीफुलांच्या माळा त्यांच्या माथ्यावर हसती,
रंगदार झेंडूंच्या माळा गळ्याध्ये खुलती.

गेठ्यामधल्या गंखुर कवड्या कशा हासतात,
मोहकरीवर गोल आरशा चमचम करतात.

पाय धुवुनिया करा तयांची पूजा प्रेमाने,
खाअूं घाला आज तयांला सारीं पक्वान्नें.

लहानमोठे सर्व येअुनी नमन करा त्यांस,
त्यांच्यावाचुन मिळायचें नच अन्न आपणांस.

हेंच अेकटें शेतकऱ्यांचें दैवत प्रेमाचें,
आज पुजुनिया अुपकाराचें रिण फेडायाचें !

सेवा करिती सतत आमुची अूनपावसांत,
पूजा करुनी अेक दिवस का होअूं ऋणमुक्त ?

---

## २७

# तिचें नशीब

( जाति–दिंडी )

भाविकाळाचें चित्र कल्पुनी ही—
पोर चिमणी बघण्यांत गुंग होऔी,
‘ शेत हासे भरघोस हें पिकून
त्यांत आनंदें फिरे घरधनीण. ’

* * *

जाऔु आम्ही शेतांत रोज दोघे,
आणि लागूं कामास झणीं वेगें,
जवळ असतां ‘ ते ’ सारखें श्रमून
काय देहाला वाटणार शीण ?

धनी जेव्हां बसतील न्यहारीला,
गोफणीने अुडवीन पांखरांला.
धनी विहिरीवर मोट हाकतील,
कोण बारीं मजवीण मग धरील ?

धान्य शेतांतिल सर्व काढुनीया,
जपुनि ठेविन मी घरीं आणुनीया,
धनी भोळे, कुणि सहज फसविणार !
सर्व परि मी खंबीर पाहणार ! ”

* * *

शेतवाडी, घरदार, गुरें-ढोरें,
जप्त करुनी ने सावकार सारें.
आणि जगवाया दोन दीन जीव,
जाय शहरीं तो सोडुनिया गांव.

खपे नवरा, हा करितसे हमाली
मोलकरिणीचें भाग्य तिच्या भाळीं,
धुणें धुवुनी ती दिवस कंठणारी,
आणि भांडीं जाहली घासणारी.

मराठी ग्रंथ संग्रहालय

२८

## दसऱ्याचें सोनें

( जाति–दिंडी )

आज दसऱ्याचा दिवस मुहूर्ताचा,
जरा कोठे विश्रांति घ्यावयाचा !
‘ परी राखावें आज कसें शेत ?’
चूर होता तो याच काळजींत.

* * *

शिवेवरती अेकलें शेत त्याचें,
पीक कडव्याचें गोड त्यांत नाचे.
आज दसऱ्याचें लुटायास सोनें,
गांव सारें लोटलें त्या दिशेने.

“ कुणा विनवी, कोणास धाक दावी,
चिडुनि कोणावर दांत ओठ खाअी,
हात जोडी जंव शिष्ट पुढे येअी,
कुणा रागवुनि मारण्यास जाअी. ”

परी गरिबाचें अैकणार कोण ?
दंग सोनें लुटण्यांत सान-थोर.
फेस त्याच्या मुखिं ओरडून येअी,
शेत अिकडे मोकळें सर्व होअी,

* * *

पूर्वि दसऱ्याला वीर-पूर्वजांनी,
भव्य-रिपुनगरें आणिलीं लुटोनी
आज आम्ही दिग्विजय परि करोनी,
दीन-दुबळा रडवितों बंधु कोणी.

२९

## अंबारींतून

( जाति—केशवकरणी )

खुशींत यंदा मेघराज ये, नियमाने वर्षुन,
देतसे अणुरेणुस जीवन.
प्रसन्न झाली धरणीमाता, धन जें हृदयांतरीं,
अुधळिते पानापानावरी.
तडफडे भुकेला जीव, पुढें पाहुनी—
पक्वान्न ताट, हो हर्षें वेडा क्षणीं,
भरघोंस पिकाची तशी पडे मोहिनी.
आनंदाचा पूर लोटला सर्व कृषीवल-गणीं,
रचितसे बेत नवे तो मनीं.

पीक काढुनी घरांत न्यावें, तोंच दैव कोपलें,
ढगांनी नभ सारें व्यापिलें;
मुसळधार पाअूस कोसळे, बेसुर बिजली रडे,
अकालीं विपरित असलें घडे.
क्षणिं पीक सर्वही पाण्यामध्ये बुडे
तृण-धान्यें-कडबा दो दिवसांतच सडे,
श्रम-आशा-वैभव मातिंत सारें दडे.
अेकच फटका दैवाचा, क्षणिं अंबारींतुनि परी
कोसळे शेतकरी भूवरी.

परी गरिबाचें अैकणार कोण ?
दंग सोनें लुटण्यांत सान-थोर.
फेस त्याच्या मुखिं ओरडून येअी,
शेत अिकडे मोकळें सर्व होअी,

* * *

पूर्वि दसऱ्याला वीर-पूर्वजांनी,
भव्य-रिपुनगरें आणिलीं लुटोनी
आज आम्ही दिग्विजय परि करोनी,
दीन-दुबळ्या रडवितों बंधु कोणी.

२९

## अंबारींतून

( जाति—केशवकरणी )

खुशींत यंदा मेघराज ये, नियमाने वर्षुन,
देतसे अणुरेणुस जीवन.
प्रसन्न झाली धरणीमाता, धन जें हृदयांतरीं,
उधळिते पानापानावरी.
तडफडे भुकेला जीव, पुढें पाहुनी—
पक्वान्न ताट, हो हर्षें वेडा क्षणीं,
भरघोंस पिकाची तशी पडे मोहिनी.
आनंदाचा पूर लोटला सर्व कृषीवल-गणीं,
रचितसे बेत नवे तो मनीं.

पीक काढुनी घरांत न्यावें, तोंच दैव कोपलें,
ढगांनी नभ सारें व्यापिलें;
मुसळधार पाऊस कोसळे, बेसुर बिजली रडे,
अकालीं विपरित असलें घडे.
क्षणिं पीक सर्वही पाण्यामध्ये बुडे
तृण-धान्यें-कडबा दो दिवसांतच सडे,
श्रम-आशा-वैभव मातिंत सारें दडे.
अेकच फटका दैवाचा, क्षणिं अंबारींतुनि परी
कोसळे शेतकरी भूवरी.

———

३०

# गुराखी

( वास्तवचित्र )

( जाति—केशवकरणी )

अुठुनि सकाळीं, काठी घेअुनि, दारोदारीं फिरे,
जमवितो गोठाणावर गुरें
जीर्णे लक्तरांतुनी तयाची कृष्ण जीर्ण तनु दिसे,
जरी तो झाकाया झटतसे.
शिळी भाकरी असेल तितुकी बांधुनिया घेतसे.
घेअुनी गुरें वनीं जातसे.
ओढाळ गुरें हीं स्वैर धावती वनीं,
तो वळवी धावुनि कुंपण-काटयांतुनी,
हो व्याकुल येती अश्रू डोळयांतुनी,
बोचुनि कांटा पायीं अथवा केव्हां ठेंचाळुनी,
लाल हो पाउल रक्ताळुनी.

ढोर कुणी हें पिकांत शिरतां हळुच नजर चुकवुनी,
येतसे शेतकरी धावुनी.
म्हणे " कोंडवाडयांत नेअुनी कोंडिन सारीं गुरें,
वळिल तीं कोण तुझा बापरे ? "

लाखोली मोजुनी शिव्यांची अुद्धरितो पूर्वजां,
करी कधि जोडथानेही पुजा.
लाचार होअुनी हातपाय जोडुनी,
पायास लागुनी करी दीन विनवणी,
सारखीं आसवें गळती डोळ्यांतुनी,
कशींतरी तो गुरें सोडवुनि वळतो दुसरीकडे,
त्यांतही समाधान त्या घडे.

स्वैर अुधळितां गुरें, वळवितो ओरडुनी सारखा,
येतसे फेस तयाच्या मुखा.
दुपार होतां चटका लागे, व्याकुळ हो अंतर,
तापतां डोक्यावर भास्कर.
गुरें जमवुनी झाडाखाली करावया न्याहरी
काढतो फडक्यांतिल भाकरी
भिजवून आसवासवे सुकी भाकरी—
हा बसे खावया, दृष्टि गुरांवर तरी,
कुणि गाय चपळ तों मागे पिकाचा धरी.
फडक्यामध्ये तशीच भाकर हातांतिल दुमडुनी
जातसे वळवाया धावुनी.

संध्याकाळीं वळतां पक्षी जाया घरट्याकडे,
गुरें तो वळवी गांवाकडे.
बांधायाचीं गुरें नेअुनी प्रत्येकाच्या घरीं,
पाजुनी पाणी हाळावरी.

चुकुनि कुणाचें ढोर राहिलें रानीं मागे तर,
जावया निघे वनीं सत्वर.
कुणि म्हणे ‘ अुपाशी गाय दिसे आज रे,
रानांत बसवुनी ठेवितोस का गुरें ? ’
कुणि म्हणे ‘ आज किति लवकर आलास रे.’
सदा अैकतां शब्द असे हे, असह्य कटु-जीवन
कंठितो दुबळा रात्रंदिन.

रोज टाकतां विकल देह तो
जीर्ण पथारीवरी
प्रार्थुनि देवा म्हणे “ सोडवी
भगवाना, लवकरी. ”

---

## ३१

# अमरवेल

( जांति– )

वाढला आम्रतरू या वनीं,
तोषवी जगाला मधुर फळें तो प्रेमाने अर्पुनी.

श्रमाने व्याकुळले जे जन,
हा अुत्साहित करि छायेमाधि नित आश्रय त्या देअुन.

× × ×

आश्रया अमरवेल येतसे,
घे झेलुनि प्रेमें कटिखांद्यावर, हृदयीं तिज धरितसे.

तयाचा जीवनरस शोषुनी,
तरुशाखावरती हलुहलु खेळे, वाढतसे अनुदिनीं.

विषाद न वाटे त्याला परी,
नच माता कष्टी बाळ हृदयरस शोषुनि वाढे जरी.

तयाला व्यापी चहुबाजुंनी,
विस्तार पाहुनी असा आपुला नाचे आनंदुनी.

जळाया तरुवर परि लागला,
सामर्थ्य निमालें, तेज पळालें, प्राप्त होय मृतकळा.

प्रमत्ता विकटपणें ती हसे,
अनिवार यशाचा कैफ, हरपुनी शुद्धबुद्ध जातसे.

आणि ती कृतघ्नता पाहुनी.
जग सोडुनि जाओ अेके दिनिं तो, मृत्यु बरा वाटुनी

वाढली ज्याच्या जीवावरी,
निःसत्व करुनिया तयास मारी, दिसाख मिरवी वरी.

क्षणानें हर्ष जातसे लया,
ये विपरित अनुभव मिळे न आतां जीवनरस प्यावया.

होतसे व्याकुळ अन्नाविण,
नाकळे तियेला कसें करावें जीवित-संरक्षण.

ज्ञान हें अुशिरा कळलें परी.
नित पश्चातापें रडे, जळतसे दुःखानें अंतरीं.

जयाच्या बसुनी खांद्यावरी,
ही मिरवी डौलें, मृत्युस त्याच्या कारण होओ परी

व्हायचें तेंच शेवटी घडे.
अमरत्व ठरुनिया व्यर्थ मरुनीया भूमीवर ती पडे.

---

मराठी ग्रं

# ३२

## शिवबा

( जाति—चंद्रकांत )

वर्षा आली अमृत स्वर्गामधलें उधळीत,
ग्रीष्माने तापल्या धरेचा जीव शांतवीत.
ओहळ-नाले तुडुंब भरले, पळती सैराट,
हासत नाचत गाअुं लागती जीवन-संगीत.
नवा तजेला पानापानावरि चमकूं लागे,
वृक्ष-लतांचे अस्फुट झाले हृदयभाव जागे.
दिशादिशांतुनि मधुर दरवळे सुगंध मातीचा,
हृदयभाव तो गोड दाखवी धरती मातेचा.
तीव्र अुन्हाने कोमजलेला कण कण न्हाणीत
शेतकऱ्यांचीं हृदयें फुलवित आली बरसात.

* * *

करावयाची पीकपेरणी सर्वांना घाअी,
या घटकेवर जीवन सारें अवलंबुनि राही.
भूक तहान न सुचे, न पर्वा कष्टाची करिती,
लहान-मोठे वाट सर्वही शेताची धरिती.
दिवस रात्र हें पहावयाला कोणाला वेळ?
एक काळजी, कशी पेरणी लवकर संपेल.

अंथरुणातुन दुखणाअित अन् दुबळे म्हातारे
उठुनि चालले शेतमळ्यांच्या मार्गाने सारें

* * *

शिवबा–सगुणा चूर आपुल्या होतीं दुःखांत,
चार दिवस जाहले तरी नच जाती शेतांत.
बाळ अेकलें हें नवसाने त्यांस लाभलेलें,
अंथरुणावर तापाने तें फणफणुनी पडलें.
तळमळ तगमग एकसारखी चाले बाळाची,
तळमळ तगमग इकडे चाले यांच्या हृदयांची
कळी कोवळी मलूल झाली ताप अंग जाळी,
शिवबा–सगुणा–हृदयीं पेटे दुःखाची होळी.
रोज सारखें दिसे वाढतें तापाचें मान,
आणि तयांचे गोळा होती डोळ्यांमधि प्राण.
अश्रू गाळित घेऊन बसती मांडीवर बाळा,
कसें सुचावें पीकपेरणी त्यास करायाला ?
जधी पेरणी करावयाचे सरत दिवस आले,
आवरून मन अपुलें शिवबा सगुणेला बोले,
" आज पेरणी शेतामध्ये जरी न होणार,
कसा वर्षभर डोळ्यांना मग दाणा दिसणार ?
बाळ तापलें अिकडे, तिकडे शेत पडे खाली
विहीर अिकडे आड पलिकडे असली गत झाली,"
" दोनतीन माणसें घेअुनि शेतामधि जावें,
आणि एकदा पेरणिचें हें काम संपवावें,

येथे तोंवर बाळाचें मी सारें पाहीन,
लौकर यावें शेतामधलें काम संपवून."

उपाय नव्हता, उठला करुनी दगडाची छाती,
शेतामध्ये जाई व्याकुळ अतिशय जरि चित्तीं.

एकसारखी तिफण झरझरा यंत्रापरि चाले,
कसें संपतें काम एकदा असें तया झालें.

काम करी शेतात परी मन नव्हतें कामांत,
बाळाभवती फिरे सारखें तें घिरट्या घेत.

सुटकेचा निश्वास सोडला काम संपतांच,
गाडी जुंपुनि परत निघाला घरा लागलीच.

मुलांप्रमाणें वाढविलेली बैलांची जोडी,
चुकून फटका कधी तयांना शिववा नच ओढी.

पुरे इशारा, सुटती चौखुर बैल, जसा वारा,
आज तयांच्या पाठीवर दे शिववा फटकारा.

वेशीमधुनी गाडी शिरली जेव्हां गांवांत,
समोर त्याला पाटिल दिसले उभे चावडींत.

उभ्या गांवचे तेच एकले राजे-सरदार,
तिथे कायदा शब्द तयांचा सर्व मानणार.

खुणावून हाताने त्यांनी गाडी थांबविली,
लांडग्यापुढें शेळी तशि गत शिवबाची झाली.

" वाट पाहतों केव्हांपासुन नच कोणी येओी,
साहेबांना असे जायची घरीं फार घाओी.

फिरवी गाडी, लवकर येअी त्यांस पोचवून,
बाअी वाटेकडेच असतिल डोळे लावून.

मुलगा त्यांचा असे यायचा शहरांतुनि आज,
सुचेल त्यांच्या जिवास येथे कसें कामकाज ?

बैल तुझे तर वाऱ्याच्याही पुढे धावतील,
खूष तुझ्यावर साहेब किती शिवबा होतील. "

" पोर घरामधि गेलें आहे फारच तापून,
म्हणुनच आलों कामहि अपुरें पाटिल टाकून."

" उलट जाब देतोस कुणाला ? होसी शिरजोर,
दोन चार घंट्यांत पोर का मरून जाणार ?

अरे जागल्या, धर बैलांना फिरवी गाडी ही,
गोड बोलतां या मूर्खाची समजूत न होअी."

चार जागले धावत आले हुकूम ऐकून,
आणि फिरविली गाडी त्यांनी जोतें पकडून.

पाटिल राजे, तिथे तयांला कोण दुखविणार ?
कोण शब्द मोडाया त्यांचा तेथे धजणार ?

साहेबांची स्वारी बसली हासत गाडींत,
शिवबाच्या तरळती आसवें इकडे डोळ्यांत.

* * *

साहेबांना पोचवून ये शिवबा गांवाला
मध्यरात्रिचा समय तेधवा अुलटुनिया गेला;

गांव सर्वही अंधाराने होतें झाकळलें,
उंच वाढल्या निंबांचें नच पान एक हालें.

सर्व दिवसभर धडपडणारें गांव निजे शांत
रातकिडयांचें मात्र कानिं ये बेसुर संगीत

त्यांत मिसळला चाकांचा हा खड खड खड नाद
मधेच घुत्कारून देतसे घुबड तया साद

* * *

करीत खड खड वेशीमध्ये गाडी जों शिरली
तोंच अेकदम एकसुराने कुत्रीं ओरडलीं.

ओटीवरती दुरून दिसली मिणमिणती पणती.
हृदय चरकलें; दोर तयाच्या हातांतुनि गळती.

त्याच ठिकाणीं देअी गाडी तशीच सोडून,
तिरासारखा अंगणांत तो येअी धावून

पुढे पाहतां छाती त्याची फाटुनिया जाअी,
क्षणांत डोळयासमोर त्याच्या अंधारी येअी.

शिवबा दिसतां शव कवटाळुनि सगुणा ही वेडी
" धनी, आपुलें बाळ, " अेकदम हंबरडा फोडी.

* * *

कोण कराया सांत्वन त्यांचें समर्थ या जगतीं?
दुःख तयांचें वर्णाया का शब्द कुठे असती!

---

## ३२

# राणूचें शेत

## १

( जाति–साकी )

सातपुडथाच्या पायथ्यास तें वसलें आहे गांव
नांव तयाचें–काय त्यांत पण ! हवे कशाला नांव ?

शेतकरी त्या गांवीं राहे राणू साधाभोळा,
शिवेपलिकडे असलेलें जग नव्हतें ठाउक त्याला.

गांवाच्या कोपऱ्यांत त्याचें घरटें दीड खणाचें,
गांवाजवळच शेत काळिचें होतें चार बिघ्यांचें.

काम वर्षभर करी सारखें रात्रंदिन शेतांत,
तेव्हां कोठे धान्य पिकतसे पोटापुरतें त्यांत.

दिवसा शेतामध्ये मोडुनी अंग, करावें काम,
जेवुनि रात्रीं स्वस्थ निजावें म्हणुनि मुखाने राम.

लोभमोह नच, अिच्छा दुसरी मनांत त्याच्या काही
आपण आणिक काम आपुलें गुंग यांत तो राही.

* * *

श्रीमान् मोठे गांवामध्ये धनमल नामक शेट,
बाप तयांचा लोटा घेअुनि आला होता तेथ.

गांवाच्या जवळचे मळे हे सारे धनमलजींचे,
मधेच त्यांच्या शेत चिमुकलें तें येओी राणूचें.

चहुबाजूंना शेती अपुली माधि दुसऱ्याचें शेत,
कसें रुचावें शेटजीस हें, व्याकुळ होओी चित्त.

कसेंहि करुनी मिळवावें तें बेत तयांनी केला,
बोलावुनि मग हेतु मनांतिल पाटलास सांगितला.

शेट पुढारी सर्व गांवचे पाटिल कूळ तयांचें,
पाटलास मग धैर्य कोठलें त्यांना दुखवायाचें ?

* * *

दुसऱ्या दिवशीं पाटिल आणिक चार पुढारी जमले,
धनमलजींच्या घरीं तयांनी राणूला बोलविलें.

राणू येतां हात धरुनिया धनमलजी प्रेमाने,
गादीवरती जवळ बसविती त्याला सन्मानाने.

आपुलकीने बघुनि त्याकडे पाटिल गालीं हसले,
न कळे त्याला असें कसें हें नवलाओीचें घडलें.

" कसें काय चाललें राणबा ? सर्व असे ना ठीक ?
झकास दिसतें या वर्षाचें शेतामधलें पीक ! "

' राणूजीला ' सुचे न काही काय तिथे बोलावें !
बघुनि माणसें मोठीं भवती मन कां न गोंधळावें ?

जरा अिकडच्या आणि तिकडच्या गप्पा चालू होती;
हसत हसत मग हळूच पाटिल राणूजीला म्हणती,

" दोन्ही बाजुंस शेती यांची, मधे तुझें तें शेत,
मळा करावा एक सर्व हा यांच्या मनिचा हेत.

लहानसें हें शेत मधे ये, फार अडथळा होअी
एक विनंती त्यांची तुजला, शेत तयांना देअी.

देतिल दुसरी तेवढीच तुज जमीन काळीभोर
आणिक वरती देअूं म्हणती घर अेक छानदार."

"वा ! वा ! राणू संधी आली नामी घे साधून
शेत चांगलें, आणिक वरती घरही घे मिळवून."

पिंजऱ्यांतले पोपट वदती ते बोल पढविलेले,
'शब्द हिताचे' असे तयांचे ऐकुनि राणू बोले,

"विकावयाचें नाही मजला कधिही माझें शेत
शेत नको मज नकोच दुसरें काहीही बदल्यांत."

राणूच्या मग खांद्यावरती ठेवुनि प्रेमें हात,
पाटिल नेती समजाविण्याला बाजूस कोपऱ्यांत.

कसा फायदा होतो करुनी हिशेब जरि दाखविला,
तरी पटेना समजुत त्याची नव्हतें डोकें त्याला.

करिती घासाघीस, शेवटीं त्यास म्हणाले शेट,
"दसपट मोठें काळीचें तुज बदला देतों शेत.

मोठा वाडा नवा बांधला जो मीं गेल्या सालीं,
तो अन् माझी गोऱ्ह्यांची ही जोडी तुझीच झाली.

लहानसें तें शेत तुझें रे काय असें मोलाचें,
मीच म्हणुनिया अितकें देतों वेडया मोल तयाचें.

संधी असली गमावली तर होअिल पश्चात्ताप,
कोण तयाला दुसरा देअिल किंमत वारेमाप ?

भिकारड्या, त्या शेतासाठी कां धरिशी ताणून ?
क्षणांत जातिल हलाखिचे हे तव दिवस पालटून. ”
“ भिकारडें तें शेत तुम्हां परि मला जिवाभावाचें.
प्राणापेक्षां अधिक वाटतें मजला मोल तयाचें.
शेतमळे वा महालवाडे नकोत मजला तुमचे
मला वाटतें लहान माझें शेत लाख मोलाचें.”
उठून, त्याने ‘ राम राम ’ मग त्या सर्वांना केला
‘ येतों ’ म्हणुनी चालुं लागला शेताच्या मार्गाला.

* * *

पाटिल आणिक चार शहाणे होते जे जमलेले
शब्द ऐकुनी राणूचे ते चकित सर्वही झाले.
“ मूर्ख वेडगळ,” म्हणती, “ त्याला अक्कल नाही काही
संधी असली पुन्हा तया नच लाभणार केव्हांही.
शेत किंमतिचे दसपट आणिक सुंदर मोठा वाडा
नको, चिमुकलें शेत त्याहुनी अधिक म्हणे हा वेडा.”

* * *

तुमच्यापैकी जर का कोणी खेड्यांमध्यें गेलां
“ वेडे राणू अजून दिसतिल कोठे कोठे त्याला.”

—

## ३४

# राणूचें शेत

## २

एकसारखें रात्रंदिन करि शेतामध्ये काम,
तयार केलें शिवार, शिंपुनि कणाकणावर घाम.

दगडखडा नच उरला एकहि फोडायास सुपारी,
घालुनिया खत, पेरायाची केली सर्व तयारी.

पाउस सळसळ पडूं लागला, वर्षा हासत आली,
आणि पेरणी राणूजीने सर्वांआधीं केली.

रोज जाउनी बांधावरती शेताला तो पाही,
रोज पाहतो तेंच तेंच परि हृदय तृप्त ना होई.

हळूच सारुन भूमातेचा पडदा नाजुक रोप,
अस्फुट मिटलीं पानें उघडित संपवून ये झोप.

पिवळें किंचित हिरवें पाहुनि पीक दोन पानांचें,
त्यास पारणें फिटलें वाटे क्षणिं अपुल्या डोळ्यांचें.

*　　　*　　　*

दुसऱ्या दिवशीं सकाळींच तो बांधावर जों आला,
समोर बघुनी शेत व्याकळुन धरणीवरती पडला.

श्रम वर्षाचे सर्वहि झाले त्याचे मातीमोल,
जळून गेल्या क्षणांत आशा समूळ हृदयांतील.

धनमलजींचें शेत पलिकडे बांधाला लागून,
कालच गेले होते त्याचे लोक शेत पेरून.

बैल मोकळे सोडुनी देती सारे संध्याकाळीं,
पीक कोवळें सर्व तुडविलें त्यांनीं पायाखाली.

रडत ओरडत, छाती बडवित, पाटलांकडे आला,
व्याकुळतेने कथी तयांला हा पडलेला घाला,

धीर देअुनी पाटिल न्यायी आश्वासन त्या देती,
'नुकसानीची भरपाअी या करून घेअूं' म्हणती.

लगेच त्याला घेअुन पाटिल तसेच अुठुन निघाले,
करीत सांत्वन, धनमलजींच्या घराकडे ते आले.

पाटिल दिसतां हसत शेटजी म्हणती, "या पाटील.
कुठे राणबा अिकडे वळलें आज गड्या, पाअूल ?"

पाटिल म्हणती, "काल शेटजी अनर्थ मोठा झाला,
दुर्दैवाने गरीब अमुचा राणू ठार बुडाला."

'अरे ! अरेरे ! काय जहालें ? सांगा पाटिल सगळें,
मोघम तुमचे शब्द ऐकुनी व्याकळून मन गेलें.

नसे राणबा परका कोणी त्याचें जें नुकसान—
तेंच आमचें, द्याना चट्कन स्पष्ट जरा सांगून."

"काल पेरणी झाल्यावरती घरीं यायच्या वेळीं
बैल मोकळे लोक सोडती तुमचे संध्याकाळीं.

नुकतें कोठे पीक उगवलें राणूच्या शेतांत
तुडवुनि तुमच्या बैलांनी ते मिळवीलें मातींत."

ऐकुनि थरथर संतापाने कापुं लागले शेट
नोकर सारे बोलावुनि ते म्हणती चावुनि ओठ,

"अक्कल नाही काय तुम्हांला? गाढव कैसे बनलां!
मूर्खपणाने तुमच्या राणू धुळींत आज मिळाला.

माफ रायबा कर मज, देतों भरून मी नुकसान,
दुप्पट दाणा घेअुन जाओ करी पेरणी छान.

मूर्खपणा जर नौकर करिती, पाहिजेच निस्तरलें,
दिलें पाहिजे भरून कितिही नुकसान जरी असलें.

पहिलें गेलें पीक अजुनि तरि पेरणीहि होअील,
देवावरती ठेव भरवंसा, बरकत तो देअील."

बघुनि पाटलाकडे शेटजी मिचकावुनिया डोळा
समक्ष देती दुप्पट दाणा राणुस बिजवाअीला.

धनमलजींचें 'धर्मात्मा' हें नांव चहुकडे गाजे,
न्यायी पाटिल डंका अैसा गांवामध्ये वाजे.

असे रिकामा कोण बोलणें अैकाया राणूचें
रडे, तळमळे, दीर्घ अुसासे सोडित तो दुःखाचे.

व्यर्थ पेरणी गेली, केली जी पहिल्या दिवसाला
आज शिंपलें रक्त तरी का बहार येअिल तिजला!

करायचें परि काय? टाकुनी दाणा ये शेतांत,
कष्टी राणू बसे कपाळा सदा लावुनी हात.

अुशीर झाला पेरायाला पीक कसें येअी !
परंतु चोरी खरें तयाला सांगायाची होअी.

चिमुकल्याच त्या शेतामधि जें धान्य पिकें दरसाल
या वर्षी नच अर्धा होअी त्याच्यामध्ये माल.

* * *

करी सारखें शेतामध्ये काम मोडुनी अंग,
पुढच्या वर्षी पीक येअुनी फिटतिल वाटे पांग.

नजर ठेवुनी आशेवर या काम करी हिमतीने,
पोट बांधुनी वर्ष काढलें कसें तरी कष्टाने.

हसूं लागलें शेत, जाहली प्रसन्न धरणीमाता,
डोक्यापेक्षा उंच पऱ्हाटी होअी बघतां बघतां.

कपासबोंडें ! छे चांदीचा वाटे पाअुस पडला,
शेत पाहुनी दुःख पूर्विचें राणू विसरुनि गेला.

आज घेअुनी मजूर कापुस वेंचाया जों गेला—
बघे, कपाळीं दुर्दैवाने हाय मारला टोला.

'फुटे कपाशी, संधी साधुनि सर्व शेत चोरांनी
वेंचुन नेलें रात्रीमध्ये अकस्मात येओनी.

* * *

पुढचें काढी वर्ष करुनिया कशी तरी गुजराण
ताठा जिरला, थिजून गेला डोळ्यांतिल अभिमान

लोखंडाची कांब देह हा आता थरकूं लागे.
तनमन दुबळें जरा राबतां थके, श्रमाने भागे.

दुःख साहुनी, कष्ट घेअुनी यंदा ज्वारी पेरी,
अुमेद त्याची अवलंबुनिया याच पिकावर सारी.

शेत बहरलें, मोत्यें हसती, करि आनंदें लाणी,
कणसें सारीं ज्वारीची तो खळयांत जपुनी आणी·

अेकाकीं तों भलतें झालें, लागे आग खळयाला,
माल राणुचा सर्व खळ्यांतिल जळुनि कोळसा झाला·

ताट वाढलें पुढे, अुपाशी हसूं लागले डोळे,
तों दैवानें घांस हिसकुनी, ताट अुडवुनी नेलें

दैव कोपलें राणूवरती गांवकऱ्यांना पटलें.
म्हणती कोपे शनी म्हणोनी होय असें वाटोळें.

शनी–राहुची युती जहाली कसें कळावें त्यास ?
सुखसंसारा ग्रहण राणुच्या कायमचें खग्रास

* * *

असेंच काही काही भलतें घडुनी ये दरसाल,
दोन चार वर्षांत राणुचा पूर्ण बिघडला ताल.

धनीण आणिक चिमणीं पोरें यांचे बघुनी हाल,
हिंमत त्याची खचून गेली, सुटे मनाचा तोल.

तसाच अुठुनी अगतिक राणू शेटजींकडे गेला,
दिले तेवढे पैसे घेअुनि शेत विकोनी आला.

करुनि फाटकी तुटकीं अपुलीं चार चिरगुटें गोळा
गांव त्याच रात्रीस सोडुनी कुठे तरी तो गेला.

गांवामध्ये राणूचें त्या काही अुरलें नाहीं
गांवकरीहि त्यास विसरले, स्मरण कुणा नच होअी.

धनमलजी परि कधि झोपेमाधि दचकुनि 'राणू' म्हणती
अुभी पाटलापुढे कधि कधी राही त्याची मूर्ती.

मराठी

३५

# घरोघरीं

( जाति–भूपति वैभव )

ही प्रहर रात्रिला अुठुनि दळाया लागे
कोंबडें होतसे घरघर अैकुनि जागें.

संपतां दळण ही पाणवठ्यावर जाअी,
हो पाणी हिजला आणायाची घाअी.

शेतांत जायची करुनी सर्व तयारी,
ही हळूच अुठवी धन्यास रामपहारीं.

धनि निघे जावया घेअुन औत शिवारीं,
घट शिरीं, निघे, घे करिं बांधून शिदोरी.

शेतांत करितसे सर्व दिवसभर कष्ट,
तरि कधी दिसेना तिचा चेहरा रुष्ट.

घरिं शेतांतुन ही सायंकाळीं येअी,
तों चूल सारखी वाट तियेची पाही.

लागते भाकरी भाजाया निमिषांत,
क्षण उसंत जीवा मिळे न आयुष्यांत.

वाढते धन्याला, भरवी चिमण्या बाळां,
सारखी राबते, परी न थकवा तिजला.

सर्वांचें जेवण हासत बोलत होओी,
ही आग्रह करुनी वाढत त्यांना राही.

मग कसें तरी ही दोन घास चावून,
करि आवरसावर, भांडीं घे घासून.

झोपले सर्व ना ! घेओी हें पाहून,
पांघरूण करिते नीट हळू सारून

लागतो धरणिला जेव्हां देह तियेचा,
तों सहज होतसे समय मध्यरात्रीचा.

जर दुखलें खुपलें होय कुणी बेजार
ही असे रात्रभर जागायास तयार

क्षण एक सुखाचा तिच्या नशीबीं नाहीं.
नच हौस पूर्ण कधि त्या जीवाची होओी.

सारखी राबते, सेवा करि सर्वांची,
नच पर्वा करि ती स्वसुखाची, जीवाची.

नच तिला अपेक्षा कसली कोठे काही,
सर्वस्व आपुलें दुसऱ्यासाठीं वाही.

जातसे तियेचा अुभा जन्म कष्टांत
कष्टांतच मानी सौख्य, करीना खंत.

जर पहावयाची त्यागमूर्ति ही थोर,
या क्षणभर सोडुन शहर जरा वाहेर.

राबते सदा, घ्या घरोघरीं पाहून
जग म्हणतें सारें तिला कारभारीण.

---

## ३६

# विनवणी

( राग–झिंजोटी )

प्रभू, हें दूर करी सांकडें
तुझ्याविण पाहूं कोणाकडे ?
पाउस जमीन भिजवि न पुरी,
करावें मरमर कामहि जरी
नच मोल मिळे रे
बिजवाओचें तरी.

वाढतो कर्जाचा डोंगर,
छळितसे बसुनी छातीवर,
सावकार म्हणतो
‘ घेअिन शेती-घर. ’

चिमणीवाणी गोड पांखरं
करितां चिवचिव भरतें घर,
नच झाकाया धड
कपडा अंगावर.

हातचा नांगर कधि ना सुटे
काम जरि करून छाती फुटे
तरि घास पोटभर
मुखीं पिलांच्या कुठे !

वणवा भडके चोहींकडे,
जीव हा लपवूं कोणीकडे,
आभाळ कोसळुनि
डोक्यावरती पडे.

जोडुनी हात विनवणी पदीं
प्रभूजी, पुढच्या जन्मामधीं,
करुं नको पुन्हा मज
दुबळा कुणबी कधीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# टीपा

१ **काळजाचा तुकडा**:—**ताटी**–कपाशीच्या काड्यांनी विणलेले जाड ओबडधोबड तट्टे. शेताच्या ओबडधोबड रूपाशी तुलना करितां ती साफ वाटणें शाहजिक आहे. आपल्या शेताला शेतकरी नेहमी काळजाचा तुकडा समजतो.

२ **काय अुणें**:—' राजा परधान्या नच जोडी ! ' **जोडी नसणें**–जोड नसणें, गांवांत त्यांच्याप्रमाणें दुसरे बैल नाहीत असें सांगण्याचा हेतु आहे. **राजा परधान्या**–बैलांचीं नांवें. **राज्यधुरा**–राजापरधान्या शेतकऱ्याच्या राज्याची धुरा वाहातात.

५ **मीलन**:—**पोळी देणें**–जेवण देणें.

९ **जीवितपूर्ति**:—खेडेगांवांत नवरा व बायको रस्त्याने जात असतां साधारण ओझें असल्यास तें बायकोने घेण्याची पद्धत आहे. आपल्या तरुण आवडत्या बायकोच्या डोक्यावरची घागर अुचलून आपल्या डोक्यावर घेण्याची तिच्या पतीला अिच्छा असते. पण केव्हां ? कोणी पाहाणार नाही ही खात्री करून घेतल्यावर. जनलज्जेमुळे व्यक्त न होणारी मनोभावना अशाच रीतीने व्यक्त होते.

१० **पेरणी**:—खेडेगांवांतील काही सावकार अशिक्षित शेतकऱ्यांचे नुसते आंगठे कागदावर वठवून घेतात. पुढे आपल्या सोअीप्रमाणें रकमा घालून ते शेतकऱ्यांकडून पैसे काढतात. आंगठा वठवून घेणें ही शेट-साहेबांची पेरणी.

११ **बांधावर**:—**कडब्यांचें शेत**–ज्वारीचें शेत. **हृदयांतील मोत्यें**–ज्वारीच्या दाण्यांना मोत्यें म्हणतात. ताटांतून कणसें बाहेर यावयाचीं आहेत म्हणून मोत्यें अजून हृदयांतच आहेत ही कल्पना. **समृद्धिदेवी**–शेतकऱ्याची पत्नी. तिच्यामुळे त्याला समृद्धि प्राप्त होते.

१२ **अम्हांला काम सुचेना गडे**:—प्रणय सर्वांनाच प्रिय असतो. परिस्थितीप्रमाणें प्रणयाचें प्रदर्शन भिन्नभिन्न रीतीने होतें.

१३ **युगत**--पत्नी माहेरी गेल्यावर तरुण मनाला किती ओढ लागते ! तिला भेटायला निरनिराळ्या सबबी काढण्यांत मन गुंगून जातें. आपली गाय मुद्दाम सासऱ्याच्या शेताकडे हुसकून ती शोधण्याच्या मिषानें तिकडे जाऊन पत्नीची भेट घेणारा तरुण क्षणभर तुलसीदासाची आठवण करून देईल. **वरळी**–शेताची हद्द दाखविण्याकरिता केलेला मातीचा ढीग.

१४ **कारभारीण**:--**निंदणें**–पिकांतील तण काढणें. **आथ**–शेतांत काम करतांना सोईकरिता ठराविक रुंदीची पट्टी घेतात ती. **लाणी करणें**–ज्वारीचीं कणसें कापून गोळा करणें. ज्वारी कापावयाला जे मजूर येतात त्यांना मजुरीबद्दल पैसे देत नाहींत. संध्याकाळीं त्यांच्याजवळ असलेलें मोठें टोपलें–हारा–भरून कणसें देतात. **गाय** अगर म्हैस पाहाणें–गाईचें अगर म्हशीचें दूध काढणें.

१५ **केळीच्या बागेंत**:—**दांड**–शेतांत जिच्यांतून पाणी वाहते ती पन्हळ.

१६ **ओळख**:—बालविवाहाची पद्धत अलीकडेच कायद्यानें बंद झाली. पूर्वी ती रूढ असतां अशीच ओळख होत असे.

१८ **पयोदान**:—पयस्–दूध अगर पाणी. नवीन रोपांना पाणी घालणें म्हणजे पयोदान करणें. मातृहृदयांतील वात्सल्याचें हें कार्य होय.

१९ **मजूर**—खेड्यांतील आपलें शेत सोडून शहरांत येणारे व मजूर बनणारे शेतकरी नेहमीच आढळतात.

२१ **लक्ष्मी**—भाग्यवंत सून मिळाल्यास सुखांत भर पडते. सुनेला लक्ष्मी म्हणतात. **बरकत**–लाभ.

२२ **माझी देवि**—शेतकऱ्याचें पण नागर भाषेंतील हें द्वंद्वगीत आहे. शेतकऱ्यांतील नवदंपतीच्या भावना त्यांत रेखाटलेल्या आहेत. यांतील उपमा त्यांच्या तोंडी असणाऱ्या आहेत.

२३ **घरधनीण**—कृत्रिम लाजणें, लचकणें, मुरडणें ह्या गोष्टी खेड्यांतील स्त्रियांना फारशा ठाऊक नसतात. पण त्यामुळे गैरसमज होऊन त्यांच्याकडे वांकडा डोळा करून पाहाण्याचा प्रयत्न कोणीं केला की मग मात्र त्यांचें उग्र रूप कळून येतें.

२४ **आधार**—पतिपत्नींनी परस्परांना संभाळून घ्यावयाचें हें शिक्षितापेक्षांहि आमच्या या दंपतीला अधिक चांगल्या रीतीनें ठाउक आहे. बायकोच्या आथेजवळची आथ घेऊन न कळत नवरा तिच्या हिश्शाचें काम करतो व तिची फजिती होऊं देत नाहीं. प्रेमाचें हें स्वरूप उदात्त आहे हें अमान्य होणार नाहीं. शेवटीं इतर ऐवजीं अितरां पाहिजे.

२५ **संजीवन**—कितीहि श्रम झाले असले तरी निर्मळ प्रेमाच्या दृष्टिक्षेपानें ते क्षणांत दूर होतात. पत्नीच्या प्रेमांत मातेचें वात्सल्य असतें हें सर्वमान्य आहे. क्षणि जागीं क्षणिं हवें.

२६ **शेतकऱ्याचें दैवत**—राजा व परधान्या हे बैल. पोळा–हा सण श्रावणी अमावास्येला असतो. या दिवशीं शेतकरी बैलांची पूजा करितात. त्यांना कामाला जुंपत नाहीत व गोड पक्वान्नें खाऊं घालतात. **हिंगुळ**–भडक तांबड्या रंगाचा एक द्रव. **माथोटी**–सुताच्या दोराची मध्यभागीं गोंडा असणारी बैलांच्या शिंगाखाली माथ्यावर बांधावयाची शोभेची वस्तु. **गंखुर कवडी**–पांढरी व पैलु असलेली कवडी. **मोहरकी**–बैलाच्या माथ्यावरील शोभेची वस्तु. **गेठा**–कवड्या, मणी, घुंगरें यांनी गुंफलेली सुताची माळ. **रिण**–कर्ज. गळ्याध्ये जागीं गळ्यामधी हवे.

२७ **तिचें नशीब**–भांडीं घासणाऱ्या मोलकरिणींपैकी काही मोलकरिणी दैवयोगानें तो धंदा पत्करतात. त्यांतील कित्येक घरंदाज असलेल्या आढळतील. **बारी धरणें**–दांडांतून येणारें पाणी पिकांना देणें. एक वाफा भरला की, पाणी बंद करून ते दुसऱ्या वाफ्यांत वळविणें याला बारी धरणें म्हणतात.

२८ **दसऱ्याचें सोनें**–दसऱ्याला आम्ही दक्षिण शिवेवरून सोनें म्हणून कडब्यांचीं पांच ताटें व आपट्याचीं पानें आणतों. तेथे एकाद्या शेतकऱ्याचें कडब्याचें शेत असल्यास तें सणांतील या रूढीच्या नांवाखालीं उजाड केलें जातें. शत्रूंचीं नगरें लुटणारे आम्ही आज असें सोनें चोरून आणण्यांत धन्यता मानतों. त्या शेतकऱ्याचे प्राण मात्र डोळ्यांत गोळा झालेले असतात.

**२९ अंबारींतून**—नेमाने पाऊस पडून सुंदर पीक आलें की शेतकऱ्यांना फार आनंद होतो. पण कित्येकदा एकदम अकालीं पाऊस येऊन सर्व पीक वाया जातें व एका क्षणांत शेतकरी अंबारींतून धुळींत फेंकले जातात.

**३० गुराखी**—मुरली वाजवीत ओढ्यासंगें फिरणारे गुराखी काव्यप्रांतांत सर्वत्र आढळतात. पण खरा गुराखी पहावयाचा तर खेड्यांत जाऊन प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलें पाहिजे. मग मात्र गुराख्याचा हेवा कोणीहि करणार नाही.

**३१ अमरवेल**—झाडांतील रस शोषून त्यावर जगणारी एक वेल. ज्या झाडावर वाढते त्याच्या मृत्यूला ही कारण होते. शेतकऱ्यांच्या जिवावर आनंदाने चैन करून त्यांच्या घाताला कारण होणारांनी थोडासा सुविचार करावा अशी अपेक्षा केली तर ती चुकीची होईल काय ?

**३२ शिवबा**—पीकपरणी ऐवजी पीकपेरणी पाहिजे.

**३३ राणूचें शेत—पिंजऱ्यांतले पोपट**—शेटजीभोवती जमलेले लोक शेटजींनी सांगितल्याप्रमाणें बोलणारे होयबा होते.

**डोकें नव्हतें**—हिशेब करणें डोक्याचें काम आहे, हृदयाचें नव्हे. भावनाचें कार्य हृदयाने होतें. गोऱ्ह्यांच्या जोडीचें आकर्षण शेतकऱ्यांना फार मोठें असते. **वारेमाप**—भरमसाट. **बिजवाई**—बी. **ताल बिघडणें**—अत्यंत वाईट स्थिति होणें.

REFBK-0006197